cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१११ | रविवार दि.११ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## खेळाचे राजकारण दुर्दैवीच

गेला बुधवार हा भारतातील सर्व क्रीडाप्रेमींसाठी दु:खाचाच ठरला. भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगट हिचे कुस्तीच्या ५० किलो गटातील ऑलिंपिक स्पर्धेचे निश्चित झालेले रौप्यपदक किंवा संभाव्य सुवर्णपदक त्यादिवशी हुकले. कारण, अंतिम फेरीच्या आधी तिचे वजन ५० किलोपेक्षा १०० ग्रॅम अधिक भरले आणि तिला नियमानुसार अपात्र ठरविण्यात आले. यामुळे ती अंतिम फेरी तर खेळू शकली नाहीच, पण रौप्य पदकही हाती लागले नाही.

## जालना-जळगाव नवीन रेल्वेमार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

नवी दिल्लीः महाराष्ट्र विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केंद्रीय मंत्रिमंडळाने राज्याला नवीन रेल्वे मार्ग भेट देण्याचा निर्णय घेतला. जालना-जळगाव या नवीन रेल्वेमार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. १७४ किलोमीटर लांबीचा हा रेल्वे मार्ग असेल, या मार्गासाठी अंदाजित ७ हजार १०६ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. निधीच्या ५० टक्के वाटा केंद्र सरकार आणि ५० टक्के राज्य सरकार देणार आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, केंद्रीय मंत्रिमंडळाने आठ नव्या रेल्वे मार्गांना मंजुरी दिली.

# दोन वर्षांत देशातील सर्व साखर कारखाने इथेनॉल उत्पादक होणार

### » गृहमंत्री अमित शाह यांची माहिती, साखर कारखाना महासंघाचे पुरस्कार वितरीत

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**देशातील सर्व सहकारी साखर कारखाने इथेनॉल उत्पादक होणार असल्याची भविष्यवाणी केंद्रीय सहकार आणि गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी (दि.१०) केली. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ आयोजित पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. या पुरस्कार सोहळ्यात विविध प्रकारांमध्ये देशातील २१ साखर कारखान्यांचा पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यावेळी २१ पैकी १० पुरस्कार महाराष्ट्रातील विविध साखर कारखान्यांना प्रदान करण्यात आले. दिल्लीतील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.**

अमित शाह म्हणाले की, मागील १० वर्षात देशातील साखर उद्योगात बरीच प्रगती झाली आहे. २०१३-१४ मध्ये ५ दशलक्ष हेक्टर उसाचे क्षेत्र होते, त्यात १८ टक्क्यांची वाढ होऊन ६ दशलक्ष हेक्टर उसाचे क्षेत्र देशात झाले आहे. २०१३-१४ मध्ये साखर उद्योगातून केवळ ३८ कोटी लिटर इथेनॉल उत्पादन व्हायचे. आता इथेनॉलचे उत्पन्न ३७० कोटी लिटर इतके वाढले आहे. त्याचा थेट फायदा शेतकऱ्याला होतो. देशात जैव-इंधन म्हणून इथेनॉल ब्लेंडींग अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. इथेनॉल ऊर्जा सुरक्षा, पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ आणि ग्रामीण सशक्तीकरणाला चालना देत असल्याचे शाह म्हणाले. २०३० पर्यंत २०% इथेनॉल ब्लेंडींग करण्याचे पंतप्रधान मोदींचे लक्ष्य आहे. मात्र, येत्या दोन वर्षातच हे लक्ष्य गाठण्याचा राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचा निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले. हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघातर्फे आयोजित या पुरस्कार सोहळ्यात, अमित शाह यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. देशातील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखान्याला दिला जाणारा, 'वसंतदादा पाटील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर ◄◄ पान २ वर

### महाराष्ट्राला दहा पुरस्कार

या पुरस्कार सोहळ्यात २१ पुरस्कारांपैकी महाराष्ट्राने एकूण १० पुरस्कारांसह पहिला तर उत्तर प्रदेशने ४ पुरस्कारांसह दुसरा क्रमांक पटकावला आहे. गुजरात, तामिळनाडू यांना प्रत्येकी २ तर पंजाब, हरियाणा आणि मध्य प्रदेशला प्रत्येकी १ पुरस्कार मिळाला आहे. देशातील ९२ सहकारी साखर कारखान्यांनी गुणवत्ता पुरस्कारासाठी सहभाग घेतला. यात महाराष्ट्र (३८), उत्तर प्रदेश (११), गुजरात (११), तामिळनाडू (१०), पंजाब (८), हरियाणा (८), कर्नाटक (४) आणि मध्य प्रदेश आणि उत्तराखंड (प्रत्येकी एक) सहभागी झाले होते.

## कापूस-सोयाबीन अर्थसहाय्यासाठी कृषी सहाय्यकाकडे भरा संमतीपत्र - धनंजय मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

**सन २०२३ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी पाच हजार रुपये अर्थसहाय्य राज्य शासनाच्या वतीने देण्याचा निर्णय शासन स्तरावर झाला असून ही रक्कम शेतकऱ्यांना वितरित करण्यापूर्वी त्यांच्या आधार व बँक खात्याशी संलग्न असलेल्या माहितीचा वापर करण्यासाठी पात्र असलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांनी त्यांचे वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक नाहरकत पत्र आपल्या गावाशी संबंधित कृषी सहाय्यकाकडे जमा करणे आवश्यक असल्याचे कृषिमंत्री धनंजय** ◄◄ पान २ वर



### नूतन पोलीस अधीक्षकांनी पदभार स्वीकारला

बीड: नूतन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी शनिवारी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याकडून पदभार स्वीकारला. यावेळी त्यांचा श्री. ठाकूर यांनी सत्कार केला.

## साहेब, तुम्ही फक्त लढ म्हणा..-प्रा.ईश्वर मुंडे

### शरद पवारांची घेतली भेट; माजलगावमधून उमेदवारीची मागणी



**पुणे । प्रतिनिधी**

**साहेब, तुम्ही फक्त लढ म्हणा, मी तुमचा विश्वास सार्थ ठरवेल, अशा शब्दात शरद पवार यांच्याकडे प्रा. ईश्वर मुंडे यांनी माजलगाव विधानसभेच्या उमेदवारीची मागणी केली. पुणे येथे शरद पवार यांनी भेट घेऊन ही मागणी करण्यात आल्याचे मुंडे यांनी सांगितले.**

विधानसभा निवडणूक जशी जशी जवळ येत आहे तशी तशी सर्व पक्ष आणी संभाव्य उमेदवार कामाला लागलेले आहेत. खा. शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्हा परिषद अंतर्गत नौकरीचा स्वेच्छा राजीनामा देवून पक्षात सक्रीय कार्यरत असलेले व बीड लोकसभेसाठी जनतेच्या पसंतीला उतरलेले प्रा. ईश्वर आनंदराव मुंडे ◄◄ पान २ वर

# सुषमा अंधारेंमुळे पुन्हा उबाठा सेनेला धक्का

### युवा सेनेच्या दोन जिल्हाप्रमुखासह महिला जिल्हा संघटक शिंदे गटात



**बीड। प्रतिनिधी**

**उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यामुळे बीड जिल्ह्यात उबाठा सेनेला पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. बीड जिल्हा महिला आघाडीच्या जिल्हा संघटक आणि राज्य महिला आयोगाच्या सदस्य संगीता चव्हाण, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख गजानन कदम, जिल्हाप्रमुख रविराज बडे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी उबाठा गटाला जय महाराष्ट्र केली. लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा.श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत नंदनवन बंगला येथे शिवसेनेत सोमवारी (दि.१२) प्रवेश करणार असल्याची घोषणा पदाधिकाऱ्यांनी बीडमध्ये शनिवारी (दि.१०) पत्रकार परिषदेत केली.**

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, कृषी ◄◄ पान २ वर

### सुषमा अंधारे सुपारीबाज बाई -ॲड. संगीता चव्हाण

*शिवसेनेच्य उपनेत्या प्रा.सुषमा अंधारे या पदाधिकाऱ्यांना सन्मानाची वागणूक देत नाहीत, उलट पदाधिकाऱ्यांवर एकप्रकारे दबाव आणण्याचं काम करत आहेत. त्यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून आपण उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला जय महाराष्ट्र करून मूळ शिवसेनेमध्ये प्रवेश करत असल्याची माहिती ॲड.संगीता चव्हाण यांनी दिली. अंधारे बाई ही सुपारीबाजबाई असल्याची जहरी टिका त्यांनी केली.*

### ठाकरे गटात फौजदारापेक्षा हवालदार मोठा-ॲड. रविराज बडे

*ठाकरे गटात एखाद्या प्रायव्हेट कंपनीप्रमाणे पक्षाचे काम सुरू आहे. प्रा.सुषमा अंधारे यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून अनेक पदाधिकारी ठाकरे गटाला सोडणार आहेत. युवक, जनतेच्या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची 'एनओसी' घ्यावी लागते इतकी वाईट स्थिती निर्माण झाली आहे. ठाकरे गटात फौजदारापेक्षा हवलदार मोठा झाला असल्याचे सांगत प्रा.सुषमा अंधारे यांचे नाव न घेता बडे यांनी टीका केली.*

### १२ ऑगस्टला मुंबईत प्रवेश

*दि. १२ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबई येथे हा प्रवेश होणार आहे. यावेळी बीडहून ५०० गाड्यांचा ताफा जाणार असून संगितताई चव्हाण, गजानन कदम, रविराज बडे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी सांगितले.*

### ज्येष्ठ अभिनेते विजय कदम यांचे निधन

मुंबईः मराठी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते विजय कदम यांचे शनिवारी पहाटे दीर्घ आजाराने निधन झाले. विजय कदम यांच्या निधनाने मराठी सिनेसृष्टीला मोठा धक्का बसला आहे. विजय कदम हे गेल्या दीड वर्षापासून कर्करोगाने त्रस्त होते. त्यांच्यावर उपचार सुरू होते, ◄◄ पान २ वर



# परळीत मराठा सर्वात जास्त, दुसरा कोणीही पडणारच!

### कृषीमंत्री धनंजय मुंडे यांना मनोज जरांगे यांनी पुन्हा डिवचले





**सातारा । प्रतिनिधी**

**छगन भुजबळ आणि त्यांच्या सर्व टिमला विधानसभेला पाडायचे असून परळीत सर्वात जास्त मराठा आहे, त्यामुळे तिथे दुसरा कोणीही पडणारच आहे. मराठा उमेदवारालाच मतदान करा, असे सांगून मनोज जरांगे यांनी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांना पुन्हा डिवचले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केले.**

मनोज जरांगे पाटील यांनी मराठवाड्यातील आठ जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात दौरे केले. प्रत्येक जिल्ह्यात जरांगे यांच्या ◄◄ पान २ वर

### जरांगे यांना स्टेजवरच भुवळ

मनोज जरांगे सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी ते स्टेजवर असताना त्यांना भुवळ आली आणि ते खाली बसले. त्यानंतर त्यांना पाणी देऊन एका हॉटेलमध्ये घेऊन जाण्यात आले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरु करण्यात आले.

# नमिता मुंदडा यांना पुन्हा आमदार होणं अवघड

### बाबुराव पोटभरे यांनी दंड थोपटले; केजमधून निवडणूक लढवणार





**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**केजच्या आ. नमिता मुंदडा यांच्या अडचणी कमी होण्याचे नाव घेत नाहीत. काही दिवसापुर्वी भाजपच्या माजी आ. संगिता ठोंबरे यांनी बंड पुकारत निवडणुक लढवण्याची घोषणा केली होती. त्यानंतर त्यांनी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचीही भेट घेतली. आता बाबुराव पोटभरे यांनी दंड थोपटले असून केजमधून निवडणुक लढवणार असल्याचे पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले आहे. त्यामुळे आ. नमिता मुंदडा यांना पुन्हा आमदार होणं अवघड होत चालल्याचे दिसत आहे.**

यावेळी पोटभरे यांनी अनेक महत्त्वाच्या विषयावर आपले मत व्यक्त केले. तसेच ज्वलंत विषयावर लक्ष ही वेधले. मागील काही दिवसांपासून अनुसुचित जातीसाठी राखीव केज विधानसभा मतदारसंघातून बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव ◄◄ पान २ वर

### "आ. मुंदडा यांना ओबीसीही झटका दाखवणार

आ. नमिता मुंदडा, अक्षय मुंदडा, नंदकिशोर मुंदडा यांनी लोकसभेला पंकजा मुंडे यांचे तन-मन-धनाने काम केले नसल्याची चर्चा होती. पंकजा मुंडे यांना आ. मुंदडा यांच्याच मतदार संघात गाठीभेटी दरम्यान मोठा विरोध झाला होता. त्यामुळे विधानसभेला ओबीसी समाज आ. मुंदडा यांना झटका दाखवणार असल्याची चर्चा आहे.

**बाजारभाव**

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० ऑगस्ट २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :२.०० क्विंटल | २,५०१ | २,७७१ | २,६३६ |
| ज्वारी/हायब्रिड :५३.०० क्विंटल | २,०२१ | २,६०० | ३०० |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ८.०० क्विंटल | ६,९०० | ९,२०१ | ८,०५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: २०.५० क्विंटल | २,२०० | २,८०१ | २,५६१ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ८५.५० क्विंटल | ४,१५० | ४,२४० | ४,२१६ |
| हरभरा: ५.५० क्विंटल | ५,५०१ | ६,८५० | ६,३८० |

# दुध भेसळ प्रकरणात धस सोडता बाकीचे पुढारी गप्प का?

### नागरीकांमधून नाराजी; कोण देतंय या विषारी उद्योगाला बळ





**आष्टी । प्रतिनिधी**

**दूध भेसळ प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपींवर मोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी माजी मंत्री सुरेश धस यांनी केली आहे. मात्र तालुक्यातील इतर लोकप्रतिनिधी या प्रकरणी भ्र - शब्द काढायला तयार नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे धस यांच्याव्यतिरिक्त बाकी लोकप्रतनिधींची भूमिका या प्रकरणात अळीमिळी गुपचिळी असल्यासारखे दिसून येत असल्याने नागरीकांमधून नाराजीचा सुर आहे.**

पैसे कमविण्यासाठी कोण कसा व्यवसाय करून आपले उखळ पांढरे करण्यासाठी नामी शक्कल लढवितात, असाच प्रकार आष्टी तालुक्यात पुन्हा एकदा सुरू झाल्याने, पाढऱ्या दुधावरच्या, काळ्या बोक्यांनी पुन्हा ◄◄ पान २ वर

### आरोपीला दहा दिवसांची पोलिस कोठडी

*दरम्यान या कारवाईत अंबादास पांडुरंग चौधरी याला अटक करण्यात आली असून, आगोदर न्यायालयाने दोन दिवसाची पोलिस कोठडी सुनावली होती. परंतु पोलिसांनी अजून माहिती मिळावी म्हणून पुन्हा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दि.१८ ऑगस्टपर्यंत म्हणजे दहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.*

***-विक्रांत हिंगे, प्रभारी पोलिस निरीक्षक आष्टी***

### छापा टाकला पण पुढे काय?

*अन्न औषध प्रशासनाचे अधिकारी भेसळ होत असल्याच्या संशयावरून एखाद्या दुकानावर,दुध संघावर छापा टाकतात. मात्र, एक छापा टाकला तरी त्याच्या तपासणीचे नमुने लवकर प्राप्त होत नाहीत, त्या कारवाईचे पुढे काय होते, हे नागरिकांना समजत नाही. मात्र अशी कारवाई झाली की संबंधीत भेसळीवाले साहेबांचे हात ओले करतात, त्यानंतर कारवाईला विश्रांती मिळते. फार्स नको तर प्रत्यक्षात कठोर कारवाई करावी अशी मागणी सर्वसामान्य जनतेकडून केली जात आहे.*

### किराणा दुकानांवरही छापे मारा

*आष्टी तालुक्यात काही छोट्या व्यापारी वर्गाबरोबर तेल आणि दूध विक्रीत काही बडे व्यापारी गुंतले आहेत. या साखळीत अगदी हुबेहूब दिसणारे तेल आणि दूध बनविण्यासाठी हानिकारक केमिकल्सचा वापर होत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे प्रामुख्याने तेल आणि दूधाचे तालुक्यातील विविध ठिकाणचे नमुने तपासण्याची गरज आहे.*

cmyk

## अग्रलेख

# खेळाचे राजकारण दुर्दैवीच

गेला बुधवार हा भारतातील सर्व क्रीडाप्रेमींसाठी दु:खाचाच ठरला. भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगट हिचे कुस्तीच्या ५० किलो गटातील ऑलिंपिक स्पर्धेचे निश्चित झालेले रौप्यपदक किंवा संभाव्य सुवर्णपदक त्यादिवशी हुकले. कारण, अंतिम फेरीच्या आधी तिचे वजन ५० किलोपेक्षा १०० ग्रॅम अधिक भरले आणि तिला नियमानुसार अपात्र ठरविण्यात आले. यामुळे ती अंतिम फेरी तर खेळू शकली नाहीच, पण रौप्य पदकही हाती लागले नाही. तिचा या गटात शेवटचा क्रमांक लावण्यात आला. या तांत्रिक कारणाने तिला आणि भारताला एका पदकापासून वंचित राहावे लागले. याचे दु:ख सर्वांना होणे स्वाभाविकच होते. तथापि, हे पदक गमावल्याच्या दु:खापेक्षाही या घटनेचे राजकारण करण्याचा जो प्रयत्न केला जात आहे तो अधिक क्लेषकारक आहे. विरोधी पक्ष या घटनेसाठी केंद्र सरकारला जबाबदार धरत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अप्रत्यक्षरित्या शरसंधान केले जात आहे.

काही काळापूर्वी काही भारतीय कुस्तीपटूंनी भारतीय कुस्ती संघटनेचे त्यावेळचे अध्यक्ष आणि भारतीय जनता पक्षाचे माजी खासदार ब्रिजभूषण शरण सिंग यांच्या विरोधात मोठे आंदोलन चालविले होते. या आंदोलनात विनेश फोगटही सहभागी होती. या साऱ्या घटनांचा संदर्भ तिचे ऑलिंपिक पदक हुकल्याच्या घटनेशी जोडून केले जात असलेले राजकारण योग्य आहे असे वाटत नाही. कटकारस्थानाचा आरोप तर अतिरंजित आणि काल्पनिक असल्याचे घटनाक्रम पाहता दिसते. यासंबंधी जी अनेक वृत्ते प्रसिद्ध होत आहेत, त्यांचा आढावा घेता असे दिसते की या खेळाडूचे नैसर्गिक वजन ५७ किलो होते. तथापि, तिने ते ५३ किलोपर्यंत कमी केले होते आणि काही स्पर्धा ती ५३ किलो गटात खेळली आणि जिंकलीही होती. मग तिला ५० किलो गटात का खेळविण्यात आले, असा प्रश्न विचारला जात आहे. यामध्ये काही जणांना कारस्थान असल्याची शक्यता वाटत आहे. तथापि, विनेश फोगटसारख्या मान्यवर आणि अनुभवी कुस्तीपटूवर तिला अनुकूल नसलेल्या गटात खेळण्याची सक्ती कोणी करु शकेल काय? अशी सक्ती तिने मान्य कशी केली असती? जी कुस्तीपटू केंद्र सरकारविरोधात आंदोलन करु शकते, ती अशा सक्तीसमोर मान तुकविण्याइतकी कमजोर असू शकेल काय? अशी सक्ती झालीच असती तर तिने त्याचवेळी, म्हणजे ऑलिंपिक स्पर्धेचा प्रारंभ होण्यापूर्वीच या सक्तीविरोधात आवाज उठविला नसता काय? असे अनेक प्रश्न यातून निर्माण होतात. स्वत: विनेश किंवा तिचे पती किंवा तिचे कुस्तीपटूच राहिलेले वडील आणि काका यांनी कोणीही तिच्यावर कमी वजन गटात खेळण्याची सक्ती झाल्याचा आरोप केलेला नाही, ही बाबही महत्त्वपूर्ण ठरते. इतकेच नव्हे, तर तिच्या प्रत्यक्ष काकांनीच वृत्त माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत, 'तिचे पदक हुकणे दुर्दैवी असले, तरी या घटनेचे कोणीही राजकारण करु नये,' असे आवाहन केले आहे. तसेच या घटनाक्रमात कटकारस्थान असल्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केलेली नाही. पुढचा महत्त्वाचा मुद्दा चर्चिला जात आहे, तो असा की, ऑलिंपिक स्पर्धेचा प्रारंभ झाल्यानंतर पॅरिसमध्ये काही कारस्थान घडले आहे काय? पण तीही शक्यता वाटत नाही. कारण तिला तिचा व्यक्तीगत सहकारीवर्ग निवडण्याची पूर्ण मुभा देण्यात आली होती. प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ, फिजिशियन, डॉक्टर हे सर्वजण तिने स्वत: निवडलेले, म्हणजेच तिच्या विश्वासातले होते. तसेच प्रत्यक्ष तिचे पतीही पूर्णवेळ तिच्या समवेत होते. अशा स्थितीत तिथे तिच्या विरोधात कोणी कारस्थान केले असण्याची शक्यताच नाही. स्पर्धेच्या आधी ४० दिवस तिच्या इच्छेनुसार तिला हंगेरी या देशात प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले होते. त्याहीवेळी तिच्या समवेत तिने निवडलेलेच तिचे सहकारी होते. तिने प्रयत्नपूर्वक आपले वजन ५० किलोपेक्षा थोडे कमी ठेवले होते. उपांत्य फेरीच्या वेळी तिचे वजन ४९ किलो ९०० ग्रॅम, म्हणजेच अधिकतम मर्यादेपेक्षा १०० ग्रॅम कमी होते, असे वृत्तही प्रसिद्ध झालेले आहे. तथापि, अंतिम फेरीच्या आधी या वजनात काहीही वाढ होऊन ते तिच्या गटाच्या मर्यादेबाहेर पोहचले होते. ते कमी करण्यासाठी तिने स्वत: निवड केलेले डॉक्टर परदीवाला यांनी रात्रभर प्रयत्न केले. पण या प्रयत्नांनाही नैसर्गिक मर्यादा असते. ती ओलांडून तिचे वजन कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला असता तर कदाचित तिच्या जीवालाही धोका होऊ शकला असता. हा सर्व घटनाक्रम आता प्रसिद्ध झाला आहे. तो पाहता कारस्थानाचा आरोप कोणत्याही सुबुद्ध व्यक्तीला न पटण्यासारखाच आहे. अगदी, जेव्हा तिने नैराश्याच्या भरात कुस्ती सोडण्याचा निर्णय घोषित केला, तेव्हाही तिने कोणावरही कसलाही आरोप केलेला नाही, ही बाबही विचार करण्यासारखी आहे. पण अलीकडच्या काळात राजकारण इतके स्पर्धात्मक झाले आहे, की कोणत्याही संवेदनशील घटनेचा संबंध निवडणुकीच्या राजकारणाशी जोडला जातो. ही गळेकापू स्पर्धा कित्येकदा, ती करणाऱ्यांना नव्हे, तर तिच्याशी संबंध नसणाऱ्या निरपराध्यांची हानी करते.

येत्या दोन महिन्यांमध्ये महाराष्ट्र, झारखंड आणि हरियाणा या तीन राज्यांमध्ये विधानसभा निवडणूक आहे. यांपैकी महाराष्ट्र आणि हरियाणा ही दोन राज्ये कुस्तीसाठी प्रसिद्ध आहेत. त्यामुळे विनेशसंबंधीचा हा घटनाक्रम राजकीय हत्यार म्हणून उपयोगात आणला जात असावा. तथापि, आतापर्यंत जी माहिती या संदर्भात उपलब्ध झालेली आहे, तिच्यावरून हे कटकारस्थान असल्याचे प्रथमदर्शनी तरी दिसून येत नाही. त्यामुळे आता 'ती अंतिम फेरीत पोहचल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिचे अभिनंदन का केले नाही' असा नवा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. एकदा राजकारण हाच सर्वात महत्त्वाचा मुद्दा मानायचा असा निर्धार केला की कोणतीही मर्यादा पाळण्याचे बंधन रहात नाहीत. पण खेळाच्या संदर्भात तरी असे करणे योग्य नव्हे.

# ठाण्यात शिवसेना–मनसेत राडा

## उद्धव ठाकरेंच्या गाडीवर बांगड्या, शेण फेकले, नंतर थेट कार्यक्रमात घुसले

**ठाणे । प्रतिनिधी**

**राज ठाकरेंचा ताफा अडवून त्यांच्यावर सुपारी टाकल्याच्या घटनेला आता मनसैनिकांनी जशास तसे उत्तर दिले असून उद्धव ठाकरे यांच्या गाडीवर आता मनसेच्या सैनिकांनी शेण टाकले आहे. त्यानंतर मनसैनिक आक्रमक होत थेट उद्धव ठाकरेंचा कार्यक्रम सुरू असलेल्या ठाण्यातील रंगायतनमध्ये घुसले. त्यामुळे या ठिकाणी मोठा गोंधळ उडाला.**



मनसेचे ५० ते ६० कार्यकर्ते या ठिकाणी घुसल्याने मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला. त्यामध्ये महिला कार्यकर्त्यांची संख्या मोठी होती. मनसेचे कार्यकर्ते ठाण्यातील रंगायतनमध्ये घुसले आणि त्यांनी शिवसेनेचा बॅनरही फाडला. या प्रकारानंतर शिवसैनिकही त्याठिकाणी जमा झाले आणि गोंधळ निर्माण झाला. त्यानंतर पोलिसांनी मनसेच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. शिवसेना ठाकरे गटाचा शनिवारी ठाण्यातील रंगायतनमध्ये मेळावा होता. त्यासाठी उद्धव ठाकरे हे येत असताना त्यांच्या गाडीवर शेण आणि बांगड्या फेकण्यात आल्या. नंतर मनसेचे कार्यकर्ते आक्रमक भूमिका घेत थेट रंगायतनमध्ये घुसले आणि गोंधळ घालायला सुरूवात केली. राज ठाकरे मराठवाड्याच्या दौऱ्यावर असताना बीड मध्ये त्याचा ताफा अडवून शिवसैनिकांनी त्यांच्यासमोर सुपाऱ्या फेकल्या होत्या. त्याला प्रत्युत्तर मनसेच्या कार्यकर्त्यांनी दिले आहे. राज ठाकरेंच्या ताफ्यासमोर सुपारी फेकल्याने मनसेच्या कार्यकर्त्यांनी हे पाऊल उचलल्याचे मनसेचे नेते संदीप देशपांडे म्हणाले. यापुढे जशास तसं उत्तर दिलं जाईल असंही ते म्हणाले. मनसेच्या कार्यकर्त्यांनी घातलेल्या राड्यावर आता शिवसैनिक कशा प्रकारे प्रत्युत्तर देतात हे पाहावे लागेल.

# जरांगेंच्या आडून उद्धव ठाकरे, पवारांचे जातीय राजकारण–राज ठाकरे

**संभाजीनगर प्रतिनिधी**

**माझा महाराष्ट्र दौरा सुरू झाला तेव्हा मी मनोज जरांगे पाटील यांचे नावही घेतले नव्हते. मात्र मुद्दाम माझ्याकडे काही माणसे पाठवून घोषणा देण्यात आल्या. घोषणाबाजी करणाऱ्या या लोकांचे शरद पवार यांच्यासोबत फोटो आहेत. बीडमध्ये घडलेल्या प्रकारात तर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा जिल्हाप्रमुखच सहभागी होता. जरांगे पाटलांच्या आंदोलनाच्या आडून शरद पवार आणि उद्धव ठाकरे हे विधानसभेत मते मिळवण्यासाठी राजकारण करत आहेत. मात्र तुम्हाला जे करायचे ते करा, पण माझ्या नादी लागू नका. नाहीतर माझी पोरं काय करतील हे तुम्हाला समजणारही नाही, असा**



**आक्रमक इशारा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिला. ते छत्रपती संभाजीनगर येथील पत्रकार परिषदेत बोलत होते.**

या राजकीय नेत्यांनी माझ्या नादी लागू नये, माझे मोहोळ उठले तर यांना निवडणुकांमध्ये सभाही घेता येणार नाहीत. कारण त्यांच्याकडे प्रस्थापित असतील तर माझ्याकडे विस्थापित आहेत, असा घणाघात राज ठाकरेंनी केला. मराठा आरक्षणावरून सुरू असलेल्या राजकारणावर हल्लाबोल करताना राज ठाकरे पुढे म्हणाले की, तुमचा देवेंद्र फडणवीस यांच्यावर राग असेल तर तुम्ही त्यांच्यावर टीका करा. पण त्यासाठी समाजात कशाला भांडण लावत आहात? शरद पवार यांच्यासारखा ज्येष्ठ नेता महाराष्ट्राचा मणिपूर होईल, असे म्हणतो. याचा अर्थ मतांसाठी या लोकांकडून जातीजातींमध्ये तेढ निर्माण करण्याच काम सुरू आहे, असा गंभीर आरोप राज ठाकरेंनी केला.

## कला केंद्रातील डीजे साऊंड सिस्टिमवर बंदी घालण्याची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**

कलाकेंद्रातील डीजेमुळे कलावंतांवर उपासमारीची वेळ आली असताना, कलाकेंद्रातील डीजे साऊंड सिस्टीमवर बंदी घालण्याची मागणी अखिल महाराष्ट्र लोकनाट्य सांस्कृतिक कलाकार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.. या मागणीसाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठव अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांची भेट घेऊन निवेदन दिले. कलाकेंद्र सांस्कृतिक कलेच्या नावाखाली सर्रास डान्सबार बनले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. आरपीआयचे यावेळी आठवले) जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर, कबड्डी असोसिएशनचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण ढेपे, संघटनेचे अध्यक्ष धोंडीराम जावळे, उपाध्यक्ष युवराज गायकवाड, सचिव भीमराव काळोखे, कार्याध्यक्ष शिवाजी जावळेकर, महिला उपाध्यक्षा शोभा लाखे, महिला सचिव अर्चना जावळेकर, महिला कार्याध्यक्षा सविता अंधारे, विठ्ठल जावळेकर, विकास जावळेकर, महादेव कुडाळकर, कृष्णा मोहळकर, राजू कुडाळकर (आर. प्रकाश काळे, ज्ञानेश्वर मोहरकर, रणजीत पाटणकर, विनोद काळे आदींसह जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालना ते जळगाव या १७४ किलोमीटर लांबीच्या नव्या रेल्वे प्रकल्पाला केंद्राची मंजुरी–रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी**

**जालना–जळगाव या नवीन लोहमार्गासाठी आता केंद्रीय मंत्रिमंडळानेही 'ग्रीन सिग्नल' दिला आहे. रेल्वे बोर्डाच्या प्रस्तावावर केंद्राने शिक्कामोर्तब केले आहे. यामुळे जालना लोकसभा मतदारसंघासह मराठवाड्याच्या विकासाला हातभार लागणार आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या भागीदारीतून हा नवीन लोहमार्ग होणार आहे. राज्य सरकारने आपला ५० टक्के हिस्सा यापूर्वीच मंजूर केला आहे. रावसाहेब पाटील दानवे हे रेल्वे राज्यमंत्री असतांना, त्यांनीच या लोहमार्गाचा प्रस्ताव सादर केला होता.**



या संदर्भात दानवे यांनी जालना येथे पत्रकार परिषद घेतली यावेळी बोलताना म्हणाले कि ''दिल्लीमध्ये या देशाचे लाडके पंतप्रधान मा. श्री नरेंद्र भाई मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली बैठक घेण्यात आली, या बैठकीमध्ये अत्यंत महत्वपूर्ण असे निर्णय घेण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने केंद्रीय मंत्रिमंडळाने देशातील आठ नव्या रेल्वेमार्गांना शुक्रवारी मंजुरी दिली. यामधील सर्वात जास्त लांबीचा जालना–जळगाव या महत्त्वाकांक्षी रेल्वेमार्गाचा समावेश आहे.जालना ते जळगाव या १७४ किलोमीटर लांबीच्या नव्या रेल्वे प्रकल्पाला आज मंजुरी दिली आहे. याबद्दल मी आपले पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी, रेल्वे मंत्री अश्विनीजी वैष्णव तसेच या कार्यासाठी ज्या ज्या अधिकाऱ्यांनी मेहनत घेतली त्यासाठी मी सर्वांचे आभार मानतो व अभिनंदन करतो. हा प्रकल्प फक्त जालना–संभाजीनगरच नव्हे तर संपूर्ण मराठवाडा आणि महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्वाचा असा हा रेल्वे मार्ग ज्यासाठी मागील ३ वर्षांपासून पाठपुरावा करीत होतो तो आज मंजूर झाला आहे. मला सांगायला अतिशय आनंद होत आहे कि, १७४ किमीचा हा रेल्वेमार्ग मराठवाडा आणि खान्देशाला जोडणारा प्रकल्प आहे. यासाठी ७ हजार १०५ कोटी ४३ लाख रुपये खर्च अपेक्षित असून राज्य सरकारने यापूर्वीच ५० टक्के खर्चाची तरतूद अर्थसंकल्पात केली होती. आता केंद्रानेही मंजुरी दिल्याने या प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला असून २०३१ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हा रेल्वे मार्ग जालना, राजूर, भोकरदन, सिल्लोडमार्गे गोळेगाव, अजिंठा, फर्दापूर, जळगाव असा जाणार आहे. सुरत (गुजरात), राजस्थानच्या गाड्यांना आंध्र प्रदेश, दक्षिण भारताकडे जाण्यासाठी छोटा मार्ग म्हणून या मार्गाचा फायदा होईल. त्यामुळे येथील व्यापारी, उद्योजक, शेती, व्यापार, दळणवळण, लघुउद्योग, पर्यटन विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. जालना–जळगाव या नवीन लोहमार्गासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने 'ग्रीन सिग्नल' दिला असल्यामुळे माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी पत्रकार परिषद घेऊन निर्णयाचे स्वागत केले व भाजपा पदाधिकऱ्यांच्या सोबत बालाजी चौक, स्वातंत्र्य विर सावरकर चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे फटाके फोडून व पेढे वाटून मोठ्या उत्साहात जल्लोष साजरा करण्यात आला.

## पान १वरून...

### कापूस–सोयाबीन अर्थसहाय्यासाठी कृषी

मुंडे यांनी सांगितले आहे. २०२३ च्या खरीप हंगामामध्ये कापूस व सोयाबीन चे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले. मात्र यावर उपाययोजना म्हणून कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून राज्य शासनाने मागील वर्षीच्या सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे दोन हेक्टर पर्यंत मदत देण्याची घोषणा केली व त्यानुसार निधी सुद्धा उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर रक्कम सोयाबीन– कापूस उत्पादक असलेल्या व ज्यांनी ई–पीक पेऱ्याची नोंदणी केलेली आहे अशा सर्व शेतकऱ्यांना केली जाणार असून, शेतकऱ्यांचे आधार व बँक खाते संलग्न असलेली माहिती, कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या खात्यांवर रक्कम वर्ग करण्याच्या कामासाठी माहिती हाताळण्यासाठी शेतकऱ्यांनी वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक शेती असल्यास सामूहिक नाहरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक असल्याचे मुंडे यांनी स्पष्ट केले आहे. त्यानुसार पात्र असलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांनी सदर संमतीपत्र किंवा नाहरकत प्रमाणपत्र आपल्या गावाशी संबंधित असलेल्या कृषी सहाय्यकांकडे तातडीने सादर करावे, जेणेकरून अनुदानाच्या रकमा शेतकऱ्यांना शक्य तितक्या लवकर त्यांच्या संलग्न बँक खात्यांवरती वितरित करता येतील, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

-------------

### दोन वर्षांत देशातील सर्व साखर

कारखाना पुरस्कारा'ने पुणे जिल्ह्यातील 'भीमाशंकर सहकारी साखर कारखान्या'चा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला देशभरातील सर्व सहकारी साखर कारखान्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक, साखर क्षेत्राशी संबंधित केंद्रातील आणि राज्यातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

-----------

### सुषमा अंधारेंमुळे पुन्हा

उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती शाम पडूळे, पंचायत समितीचे माजी उपसभापती मकरंद उबाळे यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. बीड शहरातील नगर रोड भागातील राजलक्ष्मी या हॉटेलमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेला बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप व सचिन मुळूक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पत्रकार परिषद घेऊन युवा सेनेचे जिल्हाप्रमुख गजानन कदम तसेच दुसरे जिल्हाप्रमुख रविराज बडे यांच्यासह महिला जिल्हा संघटक संगीता चव्हाण यांनी शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे सांगितले. या पत्रकार परिषदेमध्ये संगीता चव्हाण यांनी उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेमध्ये सध्या कसा कारभार चालू आहे आणि शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांची मनमानी कशी चालू आहे, याचा पाढाच वाचला. आता परिस्थिती वेगळी आहे. आता दबावाखाली काम करावे लागते. कोणत्या पदाधिकाऱ्यांचे पद कधी जाईल हे सांगता येत नव्हते. पूर्वीच्या काळी जिल्हाप्रमुख दहा –दहा वर्षे काम करायचे. त्यामुळे तळागाळापर्यंत पोहोचायला संधी होती. मात्र आता एक वर्षेही पद राहते की नाही अशी शंका आहे. मला मराठवाडाभर काम करण्याची संधी असतानाही केवळ सुषमा अंधारे यांच्या मनमानीमुळे आणि चुकीच्या गोष्टी वरिष्ठांना सांगितल्यामुळे हे काम करता आले नाही. अशा बऱ्याच गोष्टी आहेत की उद्धव साहेबांना पक्ष वाढीसाठी सुषमा अंधारे अडसर ठरत आहेत. या उलट मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी महिलांसाठी खूप चांगले निर्णय घेतलेले आहेत. तळागाळापर्यंत काम करण्याची संधी आहे. या सर्व बाबींचा विचार करूनच मी आणि आमचे दोन युवा सेनेचे जिल्हाप्रमुखांनी बाळासाहेब ठाकरे शिंदे गटामध्ये प्रवेश घेण्याचे निश्चित केले असे यावेळी त्या म्हणाल्या. हा अनुभव जिल्हाप्रमुख आनिल जगताप यांनीही घेतला असल्याचे सुतोवाच संगीता चव्हाण यांनी यावेळी केले. यावेळी बोलताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप म्हणाले, आपल्याला विधानसभेचे तिकीट मिळणारच आहे आणि मी या निवडणुकीत आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने जिंकणारच आहे, असा ठाम विश्वास व्यक्त केला. यावेळी सचिन मुळक यांनी दादांना सुरुवातीपासूनच बीड विधानसभा मतदारसंघात उभे करून निवडून आणण्यासाठी आम्ही कंबर कसली असून हा विषय शिंदे साहेबांच्या ही कानावर पक्ष प्रवेशाच्या वेळी घातला होता. त्यामुळे आम्हाला तिकीट मिळणार यात कुठलीही शंका नाही, असे ते म्हणाले.

-------------

### साहेब, तुम्ही फक्त लढ

यांनी खा.शरदचंद्र पवार यांच्या पुणे येथील मोदीबाग निवासस्थानी भेट घेऊन आपले पक्ष व सामाजिक कार्य सांगून माजलगाव विधानसभा निवडणूकीसाठी मला तिकीट देवून साहेब, तुम्ही मला फक्त लढ म्हणा..माजलगाव विधानसभा पक्षाचे सर्व कार्यकर्ते व सुजान मतदार यांच्या आशिर्वादाने आपणास जिंकून देवू असा आत्मविश्वास खा.शरदचंद्र पवार यांना प्रा. ईश्वर मुंडे यांनी दिला आहे.

--------------

### नमिता मुंदडा यांना पुन्हा

पोटभरे हे आगामी २०२४ ची निवडणूक लढविणार असल्याची चर्चा ऐकावयास मिळत होती. त्या पार्श्वभूमीवर पोटभरे यांनी केज मतदारसंघातील अनेक गावांना भेटी दिल्या आहेत. तसेच प्रमुख नेत्यांच्या, सर्वसामान्य जनतेच्या आणि विविध समाज घटकांच्या गाठी – भेटी घेऊन त्यांच्या सोबत चर्चा सुरू केली आहे. संवाद साधला आहे. हे त्यांच्या अंबाजोगाई येथे शनिवार, दि. १० ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून दिसून आले. यावेळी बोलताना त्यांनी राज्यासह बीड जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय परिस्थितीवर नेमके भाष्य केले. राज्यातील अस्थिरतेबद्दल चिंता ही व्यक्त केली. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सामाजिक तणाव कमी करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. आरक्षणाच्या विषयावर सुरू असलेल्या वेगवेगळ्या टिपण्णी आधी बंद झाल्या पाहिजेत असे ते म्हणाले. तर बीड हा क्रांतीसिंह नानासाहेब पाटील ते दिवंगत नेते गोपीनाथराव मुंडे यांच्यापर्यंत हा जिल्हा पुरोगामी म्हणून ओळखला जात होता. सध्याचे जातीयवादी वातावरण जिल्ह्यासाठी व पुढील पिढ्यांसाठी पोषक नाही, असे ते म्हणाले. पोटभरे म्हणाले, आम्ही डंके की चोट पर येणार आहोत. बहुजन विकास मोर्चा ही सामाजिक संघटना आहे. जर मी राजकारणच केले असते तर केज विधानसभा मतदारसंघाचा प्रदीर्घ काळ आमदार राहिलो असतो असे सांगून पोटभरे पुढे म्हणाले की, केज विधानसभा मतदारसंघातून ज्यांना लोकप्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली त्यांनी मागासवर्गीय व बहुजन समाजाला म्हणावा तसा न्याय दिला नाही, त्यामुळे आपण केजमधून निवडणुक लढवणार असल्याचे ते म्हणाले. मी कुठल्याही चिन्हावर निवडणूक लढवू शकतो. ज्यांनी आम्हाला यापूर्वी धोके दिले त्यांना आगामी निवडणुकीत पाडणार आहोत, असा गर्भित इशारा बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी बीड जिल्ह्यातील नेत्यांचे नांव न घेता दिला आहे. यापुर्वी माजी आ. संगिता ठोंबरे यांनी तर आता बाबुराव पोटभरे यांनी केजमधून विधानसभा निवडणुक लढवणार असल्याचे जाहीर केल्याने आ. नमिता मुंदडा यांच्या अडचणी वाढल्या आहेत. ठोंबरे आणि पोटभरे हे यापुर्वी महायुतीमध्ये होते. आता त्यांनीच बंडाचे निशान रोवल्याने आ. मुंदडा यांना पुन्हा आमदार होणं अवघड दिसत आहे. आभार बहुजन विकास मोर्चा बीड जिल्हा कार्याध्यक्ष विनोद शिंदे यांनी मानले. तर यावेळी श्रीहरी नाना मोरे, भीमराव अप्पा टाकणकर, नवनाथ अण्णा धायजे, लखन हजारे, विक्की कोमटवार, अविनाश कुऱ्हाडे, विशाल पोटभरे, बाबा शेख, बालाजी मिसाळ, सुरज ताटे, धीरज वाघमारे, सूरज शिंदे, अतिष मंजुळे, रवी आवाडे, शरद पवार, अजय जोगदंड, गौतम शिनगारे, लखन चव्हाण, गोकुळ इचके, दीपक मिसाळ, समाधान मिसाळ यांच्यासह बहुजन विकास मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------------

### परळीत मराठा सर्वात जास्त,

सभेला तुफान गर्दी होती. सध्या जरांगे हे पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून सातारा येथे त्यांची सभा झाली. यावेळी त्यांनी छगन भुजबळ यांच्यावर जोरदार टिका केली असून भुजबऊ आणि त्यांच्या सर्व टिमला विधानसभेला पाडायचे असे सांगून जरांगे यांनी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांना डिवचले आहे. जरांगे म्हणाले, परळीत मराठा सर्वाधिक असून तेथे दुसरा कोणीही असला तरी तो पडतच असतो. मराठा उमेदवाराला आपली मते द्या, लिड तुटणार नाही, असे करुन दाखवा, असे ते म्हणाले. धनंजय मुंडे यांना आता जरांगे पाटील यांनी थेट आव्हान दिले असून मुंडे हे याला कसे उत्तर देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

------------

### ज्येष्ठ अभिनेते विजय

मात्र सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर अंधेरी येथील स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. विजय कदम यांनी वयाच्या ६७ व्या वर्षी अंधेरीतील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगा असा परिवार आहे. एकेकाळी रंगभूमी देखील गाजवणारे विजय कदम यांचे 'विच्छा माझी पुरी करा' हे लोकनाट्य तुफान गाजले होते. त्यांच्या निधनावर चाहते आणि सेलिब्रिटी मोठ्या प्रमाणात शोक व्यक्त करत आहेत.

------------

### दुध भेसळ प्रकरणात धस

डोकेवर काढले आहे. चार दिवसापूर्वीच कडा व टाकळी येथील दुध संकलन केंद्रावर स्वत: जिल्हाधिकारी यांनी छापा मारून दुधात मिसळली जाणारी जवळपास २० लाख रुपयांची पावडर व इतर साहित्य जप्त करुन एक आरोपीला अटक केली तर दुसरा आरोपी अजूनही फरार आहे. त्या आरोपीला पकडण्यासाठी पथक रवाना केले असल्याची माहिती प्रभारी पोलिस निरीक्षक विक्रांत हिंगे यांनी दिली आहे. जिल्ह्यात दुध संकलनात अग्रेसर आसणाऱ्या आष्टी तालुक्यात दुधात भेसळ करण्याचा प्रकार पुन्हा सुरू झाल्याने, दुधाच्या टक्केवारीत वाढ झाल्याचे समोर आले आहे. मध्यंतरी भेसळ माफियांवर कारवाई झाल्यानंतर दुधातील भेसळ करण्याचे प्रमाण कमी झाले होते. मात्र अन्न भेसळ खात्याच्या सपशेल दुर्लक्षामुळे दुध भेसळ माफियांनी पुन्हा आपले दुकान थाटले आहे. कृत्रिम दुधात कॉष्टीक सोडा, युरिया, पामतेल, अॅसिड असे शरिराला घातक द्रव्य दुधात मिक्स करून कत्रिम दुध तयार करतात. त्यामुळे नागरिकांच्या जिवाशी खेळणारा हा आघोरी उद्योग सध्या झपाट्याने वाढत आहे. ज्यांच्याकडे गायाच नाहीत, ते देखील दुधवाले बनले आहेत. त्यामुळे गाया नसऱ्यांकडे दुध नेमकं आलं कुठून अशी चर्चा सर्वत्र ऐकावयास मिळत आहे. आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी अंबादास चौधरी यांना अटक केली असून इतर आरोपी अद्याप फरार आहेत. प्रशासनाच्या या कारवाईनंतर माजी मंत्री सुरेश धस यांनी आवाज उठवत दुध भेसळ करणाऱ्यांविरोधात मोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली. तर दुसरीकडे लोकप्रनिधींसह इतर नेते मात्र यावर काहीच बोलत नाही, यामुळे नागरीकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

## पिक विमा कंपनी व शासनाच्या विरोधात शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**२०२३ चा पिकविमा बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बँक खात्याात जमा झाला तो बोटावर मोजता येतील इतक्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली. ज्या शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची तक्रार ऑनलाईन केली होती अशाच तुरळक शेतकऱ्यांच्या खात्याावर पैसे जमा झाले.जिल्ह्यात अनेक असे गावं आहेत की तिथे शेतकऱ्यांच्या शेतावर बांधावर मोबाईलला रेंज नसल्याने तर काही शेतकरी अडाणी असल्याने.त्याना ऑनलाईन तक्रारी करता आल्या नाहीत.तर संदीप फसले, दत्ता फसले, रघुनाथ थोरात, कासम शेख,हामीदा शेख,सचिन कोहक, सागर कोहक ,शांताबाई कोहक, गहिनीनाथ राऊत, फकिरा कोहक, तुकाराम कोहक ,बाळासाहेब कोहक ,मंडाबाई कोहक ,लिंबराज कोहक सर्व रा.दौलावडगाव इत्याादी शेतकऱ्यांच्या तक्रारी असून यांना अद्याप विमा नुकसान भरपाई मिळाली नाही.विमा कंपनीने त्याची दखल घेऊन झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी.**

बीड जिल्ह्यात सण २०२३ मध्ये सर्वत्र दुष्काळजन्य परिस्थिती होती. उत्पन्नात मोठी घट झाली. त्यामुळे शेतीला खर्च झालेला देखील शेतकऱ्यांना शेतातून मिळाला नाही.कुठे पावसाच्या कमतरतेमुळे तर कुठं अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास निघून गेला. शासनाकडून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात दुष्काळ जाहीर करण्यात आले असता.शेतकऱ्यांसाठी अनुदान व विमा कंपनीने पिकविमा जाहीर केला.पिक विमा कंपनीकडून अटी तटी व शर्तींच्या जाचक अटी पाई शेतकऱ्यांना सवतीच्या मुलाप्रमाणे वागणूक मिळत आहे.हा एक प्रकारे शेतकऱ्यांवर मोठा अन्यायच आहे.सरकार शेतकऱ्यांच नसून व्यापाऱ्यांच आहे काय? अशा प्रकारे संताप शेतकऱ्यांमध्ये दिसून येत आहे. एक दोन पिके समाविष्ट न करता सर्व पिके समाविष्ट करुन १००% विमा मिळाला पाहिजे अशाप्रकारची मागणी शेतकरी वर्गातून होते आहे.

## टी.सी.हरवला आहे.

लीना प्रभाकर लोणके या विद्यार्थीनीचा दहावी पासचा टी.सी. बीड–फुलसांगवी एस.टी. प्रवासा दरम्यान हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करा.

::::: संपर्क :::::

**लीना प्रभाकर लोणके, मो.नं.८२६१९१२७९०**

# भगवान बिरसा मुंडा यांचा पुतळा उभारण्याची मागणी



परतूर : मन्नेरवारलु समाज आदीवासी समाजाकडून ना. अतुल सावे ,गृहनिमाण मागास बहुजन कल्याण मंत्री, यांची सत्कार करण्यात आले व आदीवासी समाजाकडून निवेदन सादर करण्यात आले छत्रपती संभाजीनगर मध्ये आदीवासी समाज चे भगवान बिरसा मुंडा यांचे पुतळा स्मारक उभारण्यात यावे अशी मागणी करण्यात आली यावेळी गंगाधर यदुलै, आशोक अवलकर, दिपक मुंडले, निलेश बसवे, नितीन गायकवाड, कनैहया कटैगार, संतोष कुडेटकर, प्रविण गोरे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ११ ऑगस्ट २०२४



# शिक्षक समन्वय संघाचा १६ ऑगस्टपासून शिक्षकांच्या मागण्यांसाठी मोर्चा







**प्रचंड संख्येने सहभागी होऊन सरकारच्या दारात करणार हुंकार**

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व वर्गतुकड्यांतील ६५ हजार विना तथा अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शासननिर्णय १५ नोव्हेंबर २०१५ व ०४ जून २०१४ मधील वेतन अनुदान वितरणाचे सुत्र लागू करत या शाळांना १ जानेवारी २४ पासून विनाअट टप्पा वाढ लागू करणे, शासनाच्या चुकीमुळे १२,१५ व २४ फेब्रुवारी २१ च्या शासननिर्णयान्वये शासन स्तरावर त्रुटी पात्र ठरलेल्या शाळांना निधीसह समान टप्पावाढ लागू करणे यासह इतर मागण्या साठी शिक्षक समन्वय संघावतीने मुंबईतील आझाद मैदानावर १६ ऑगस्ट २४ पासून हुंकार बेमुदत आंदोलन पुकारण्यात आले आहे.

राज्यातील कायम शब्द काढलेल्या प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यावर सुमारे ६५ हजार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी पंधरा ते वीस वर्षां पासून काही विनावेतन तर काही तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. महाराष्ट्राच्या महान शैक्षणिक परंपरेचा हा अपमान आहे. शिक्षक दिनी शिक्षकांना देशाचे शिल्पकार,आधारस्तंभ म्हणायचे आणि त्यांच्या सेवेला वीस-वीस वर्षे झाली तरी विनावेतन राबवून घ्यायचे.एव्हढ्या प्रचंड कालावधीत विनावेतन आणि तुटपुंज्या वेतनावर काम करत असताना हे शिक्षक आपला उदरनिर्वाह कसा करत असतील याची जराही संवेदना राज्यकर्त्यांना नाही,या वेदना शासनापर्यंत पोहचवण्यासाठी शिक्षक समन्वय संघाच्यावतीने येत्याा १६ ऑगस्ट पासून शासनाच्या दारी बेमुदत धरणे करण्यात येणार आहे. प्राथमिक,माध्यमिक,उच्चमाध्? मिक व वर्ग तुकड्यांना मुल्यांकन वेळी ठरवलेल्या वेतन अनुदान वितरणाच्या सुत्राप्रमाणे पूर्ण वेतनाचा शासननिर्णय, शासनाच्या चुकीमुळे १२,१५ व २४ या शासननिर्णयान्वये ३० दिवसाच्या आत शासनस्तरावर त्रुटी पात्र ठरलेल्या शाळांना निधीसह समान टप्पावाढ ,पुणे स्तरावरील अघोषित शाळांना अनुदानास पात्र ठरवत वेतन अनुदान मंजूर करणे,२०१८-१९ मध्ये पटसंख्येच्या अटींमुळे टप्पा वाढीत पासून वंचित असल्यालेल्या शाळांना टप्पा वाढ करणे यासह अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत शिक्षक समन्वय संघाचे आंदोलन मागे घेण्यात येणार नाही.अशी भूमिका शिक्षक समन्वय संघाच्या वतीने शासनास दिलेल्या निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. ज्या शासननिर्णयानुसार मूल्यांकन झाले त्यााच शासननिर्णयातील वेतन वितरणाचे सुत्र रद्द करून ६५ हजार शिक्षकांवर उपासमारीची १९ सप्टेंबर २०१६ च्या शासननिर्णयाच्या माध्यमातून वेळ आणली गेली.उपरोक्त मागणीतील वेतन अनुदान वितरणाचे सुत्र लागू केल्यास राज्यातील अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना पुढील पूर्ण वेतन मिळण्यातील अडचण दूर होईल.विधिमंडळात कसलीही चर्चा न करता लाडक्या बहिणीसाठी योजना आणता पण अंशतःअनुदानीत शाळेतील शिक्षिका असलेल्या लाडक्या बहिणीना वेतधापासून वंचित ठेवले जाते अशी दुटप्पी भूमिका घेणं कितपत योग्य आहे.स्वत:चे वेतन आणि भत्ते वाढवणारे राज्यकर्ते शिक्षकांना वेतन देण्यासाठी पैसे नाही म्हणतात,ही न पटणारी बाब आहे.पुन्हा एकदा मुंबईतील आझाद मैदानावर याच मागणीसाठी शिक्षक बेमुदत आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. त्याामुळे शिक्षकांच्या सहनशीलतेचा अंत न पहाता ज्या शासननिर्णयाने मूल्यांकन केले त्याच शासननिर्णयातील वेतन अनुदान वितरणाचे सुत्र लागू करून १०० टक्के अनुदान देवून शिक्षकांची वेठबिगारी थांबवावी अशी मागणी शिक्षक समन्वय संघाने निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री,अर्थमंत्री आणि शालेय शिक्षणमंत्री यांना सादर करण्यात आले आहे.अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी आझाद मैदानावरील आंदोलनात प्रचंड संख्येने सहभागी झाले पाहिजे.जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही अर्थात मागण्या पूर्ण झाल्याचा शासननिर्णयाचा (कागद) निर्गमित होणार तोपर्यंत शिक्षक समन्वय संघ आझाद मैदान,मुंबई सोडणार नाही असे आवाहन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने प्रा.राहुल कांबळे,के.पी.पाटील,सौ.नेहाताई गवळी, प्रा.संतोष वाघ,प्रा.दिपक कुलकर्णी,यांसह हजारो शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होणार आहेत.

**अंशतः अनुदानित प्राथमिक माध्यमिक,उच्चमाध्यमिक व वर्गुतकड्यांतील शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांना १५ नोव्हेंबर २०११ व ०४ जुन २०१४ च्या शासन निर्णयामधील वेतन अनूदान वितरणाचे सुत्र लागू करावे यासह इतर मागण्यासाठी हुंकार आंदोलन पुकारण्यात आले असून मागणी पुर्ण करुन शासन निर्णय (कागद) शिक्षकांच्या हातात पडल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत आंदोलन मागे घेण्यात येणार नाही.**

**के.पी.पाटील,**
**समन्वयक,शिक्षक समन्वय संघ, आझाद मैदान मुंबई**

**शासनाच्या वतीने अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या मागण्यांबाबत घोषणा करून एक महिना उलटला असून अद्यापही या मागण्यांचा शासननिर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही.सरकारने या शिक्षक समन्वय संघाच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तात्काळ शासननिर्णय निर्गमित करून शिक्षकांना न्याय द्यावा.**

**प्रा.राहुल कांबळे**
**समन्वयक,शिक्षक समन्वय संघ,महाराष्ट्र राज्य**

**सरकारने नुकतीच लोकप्रिय लाडकी बहिण योजना आणली आहे.राज्यशासनाच्याच मान्यतेने सुरू असलेल्या अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षिका मात्र गेल्या पंधरा वर्षांझाली वेतनापासून वंचित आहेत.या शिक्षिका सरकारच्या लाडक्या बहिणी नाहीत का? असेल तर तात्काळ या लाडक्या बहिणीसाठी वेतनासाठी तरतुद करून पूर्ण वेतन सुरू करावे.**

**सौ.नेहाताई गवळी, समन्वयक,शिक्षक समन्वय संघ, महाराष्ट्र राज्य**



**बीड : जागतिक आदिवासी दिनानिमित्त महानायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना मराठी पत्रकार परिषदेचे वडवणी तालुकाध्यक्ष,ॲड.विनायकजी जाधव सर,पत्रकार अर्जुन मुंडे सर,उजगरे सर,प्रा.अंडील सर,सारोक्ते सर.**

# रामतिर्थ परिसरात सिमेंट रस्त्याच्या कामाचा अमर नाईकवाडे यांच्या उपस्थितीत शुभारंभ





बीड । प्रतिनिधी

माझ्या प्रभाग ३ मधील रामतीर्थ व पावरलूम भागात स्थानिक रहिवाशी व सहकारी मित्रांच्या उपस्थितीत सिमेंट रस्ता कामांना सुरुवात करण्यात आली.

या भागात गेल्या अनेक दिवसापासून रस्त्याची मागणी होती या भागातील रस्ते पूर्णपणे खराब झाले होते मात्र यासाठी निधी नसल्याने हे काम रखडले होते या भागाचे नगरसेवक अमर नाईकवाडे यासाठी प्रयत करून निधी आणला उपमुख्यमंत्री अजित दादा पवार पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून या रस्त्यासाठी निधी आणला आणि युद्ध पातळीवर कामांची सुरुवात केली ही कामे आता वेगाने होत असून या भागातील नागरिकांचा रस्त्यांचा महत्वाचा प्रश्न यामुळे सुटणार आहे अमर नाईकवाडे सातत्याने आपल्या वार्डामध्ये कामासाठी प्रयत करत असतात अगदी बारीकसारीक गोष्टीकडेही त्यांचे लक्ष असते पाणी कधी येणार आहे इथपासून आल्या तुमच्या झाल्या इथपर्यंत सर्व बाबीकडे त्यांचे बालकाने लक्ष असते त्याामुळे या भागामध्ये त्याांना सर्वाधिक मताधिक्याने निवडून दिले जाते.

या शुभारंभ प्रसंगी भगवानराव राजपूत, सखाराम कानडे, रामदास सरवदे, विलास मोमीन, संतोष शीरसागर, बाळासाहेब आहेर, अशोक धुताडमल, आदेश लोंढे, विजय रोकडे, सचिन शिरसागर, कलीम शेख (शेरू), सचिन रेंगे, गणेश माणकुस, विलास डिंगणे, दत्ता मानकर, अशोक चांदणे, नारायण कानडे, संकेत उमप, राजेश धुताडमल, गणेश , सय्यद रज्जाक आदी उपस्थित होते.

# परतूर मतदारसंघातून बालासाहेब आकात यांनी निवडणूक लढवावी ; कार्यकर्त्यांचा आग्रह

परतुर । प्रतिनिधी

अनेक वर्षापासून काँग्रेसमध्ये एकनिष्ठ असलेले तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये आपला वेगळा ठसा उमटविणारे परतुर बाजार समितीचे संचालक बालासाहेब आकात यांनी परतूर मंठा विधानसभेची निवडणूक लढवावी असा कार्यकर्त्यांचा आग्रह आहे. कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव २०२४ ची विधानसभा निवडणूक लढविण्याचा त्यांनी निर्णय घेतला आहे. दांडगा जनसंपर्क असलेले श्री आकात यांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांच्यासह वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली. त्यांचे या भागातील कार्य पाहता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांना निवडणुकीच्या दृष्टीने तयारीला लागा असा आदेश दिला आहे. बालासाहेब आकात यांनी ग्रामपंचायत सदस्य ते परतुर बाजार समितीचे संचालक, पंचायत समिती सदस्य तसेच काँग्रेस पक्षाकडून जिल्हा परिषद निवडणूक लढविली होती. चारित्र्यसंपन्न अशी ओळख असलेले श्री आकात यश ग्रुप उद्योग समूहाचे अध्यक्ष आहेत. विविध शैक्षणिक संस्था, पतसंस्था आणि बँका त्यांच्या ताब्यात असून या माध्यमातून ते सर्वसामान्य लोकांना मदत करतात. प्राथमिक आरोग्य केंद्र सातोना खुर्द येथे रुग्ण व नातेवाईकांसाठी कायमस्वरूपी मोफत भोजन व्यवस्था, परतुर तालुक्यात सार्वजनिक ठिकाणी फिल्टर वॉटर पाणी तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी फिल्टर वॉटरची व्यवस्था केली, दहा वर्षापासून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करतात, स्व. महेशभाऊ आकात मदतीचा हात योजनेच्या माध्यमातून गोरगरिबांना मदत करण्याचे कार्य श्री आकात यांच्या माध्यमातून होत आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक त्यांच्या माध्यमातून झालेली आहे. बैलगाडा शर्यत, अन्नदान, भव्य कुस्ती स्पर्धा, धार्मिक सप्ताह या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक परंपरा जोपासण्याचे कार्य त्यांनी सुरू ठेवले आहे. परतुर - मंठा - नेर - सेवली या भागात त्यांचा मोठा जनसंपर्क असल्यामुळे कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव त्यांनी पक्षाकडे उमेदवारीची मागणी केली आहे. सर्व धर्माचे नागरिक त्यांच्या सोबत असल्यामुळे या निवडणुकीत त्यांना काँग्रेसची उमेदवारी मिळाल्यास त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.



# संघटीत लढाईसाठी संघटन मजबूत करा -चांदणे



**माजलगाव । प्रतिनिधी**

संघटित लढाई लढायची असेल तर संघटन मजबूत असणे गरजेचे असते आणि संघटन मजबूत असेल तरच लढाई जिंकता येते,डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया हे संघटन मजबूत करा असे आवाहन डेमोक्रॅटिक पार्टीचे राज्य अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी माजलगाव येथील कार्यकर्ता संवाद बैठकीमध्ये केले.

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ता बैठक माजलगाव येथील व्यंकटेश हॉटेल येथे शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहात पार पडली.या बैठकीसाठी डेमोक्रिटिक पार्टी ऑफ इंडियाचे राज्यध्यक्ष अजिंक्य भैय्या चांदणे,बीड जिल्हाध्यक्ष सुभाष लोणके,महासचिव बाळासाहेब पौळ आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मातंग समाजाच्या अनेक तरुणांनी डीपीआयमध्ये प्रवेश केला. या कार्यकर्ता बैठकीसाठी माजलगाव मतदार संघातील सर्व कार्यकर्ते हजर होते. ही बैठक जिल्हा उपाध्यक्ष विष्णूजी अवचार,धारूर तालुकाध्यक्ष चंद्रसेन पाटोळे, वडवणी तालुका अध्यक्ष विलास कारके, चंदू आठवे,सुरेश गायकवाड, दादा खंडागळे, विजय पारवे,भरत जाधव,विजय मुजमुले,आकाश पाटोळे,अशोक शिरसगार यांनी या बैठकीचे आयोजन केले होते.

युवक जिल्हाध्यक्षपदी नवनाथ कांबळे तर मराठवाडा संघटक पदी राजाभाऊ खंडागळे यांची निवड

या बैठकीमध्ये प्रदेशाध्यक्ष अजिंक्य भैय्या चांदणे यांनी डीपीआयच्या युवक जिल्हाध्यक्षपदी नवनाथ कांबळे यांची तर मराठवाडा संघटक पदी राजेभाऊ खंडागळे यांची निवड केली. या निवडीचे डीपीआय च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी जोरदार स्वागत केले.

# ॲड.जाधव यांना आष्टी मतदारसंघातील जनतेतून उत्स्फूर्त पाठींबा; गावांगावातून होतेय निवडणूक लढविण्याची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून राष्ट्रवादी विधी सेलचे मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष तथा उच्च न्यायालयातील वकील संघाचे अध्यक्ष ॲड. नरसिंह जाधव हे आष्टी-पाटोदा-शिरुर विधानसभा मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवू इच्छित असून, त्याासाठी आष्टी, पाटोदा आणि शिरुर तालुक्यातील गावां गावांत जाऊन नागरीकांशी निवडणूक लढविण्याबाबत चर्चा करीत असताना जनतेतून त्यांच्या उमेदवारीचे स्वागत करण्यात येत असून, उमेदवारी मिळाल्यास एकजूटीने सोबत राहून निवडून देण्याचा विश्वास नागरीक व्यक्त करीत, निवडणूक लढविण्याची अपेक्षा नागरीकांकडून व्यक्त केली जात आहे.

पाटोदा येथील शरद पवारांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे स्व.ॲड. लक्ष्मणराव जाधव यांचे सुपुत्र उच्च न्यायालयात वकीली करणारे ॲड. नरसिंह जाधव यांच्या उमेदवारीला खुद्द शरद पवारांकडून ग्रीन सिग्नल मिळाला असल्याने त्याानुसार सध्या ॲड. जाधव आष्टी, पाटोदा आणि शिरुर तालुक्यातील गावां-गावांत जाऊन सर्वसामान्य जनतेशी उमेदवारीबाबत चर्चा करत असताना स्वच्छ प्रतिमेचा चेहरा म्हणून त्यांना लोकांतून उर्त्स्फूत प्रतिसाद मिळत आहे. जे प्रश्न लोकप्रतिनिधी मांडू शकत नाहीत अशा प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम ॲड.नरसिंह जाधव यांनी जनहितार्थ याचिकेच्या माध्यमातून हाती घेतलेले आहेत. यामधून सार्वजनिक प्रश्न मार्गी लागत आहे. रस्ते, पाणी पुरवठा, जमीन घोटाळा यामधील भ्रष्टचारावर आवाज उठविण्याचे काम ॲड. जाधव हे करीत आहेत.

ॲड. नरसिंह जाधव यांनी गेल्या दोन दिवसांत डोंगरकिंन्ही, अंमळनेर, पिंपळवंडी, कोतन, पांढरेंवाडी, चुंबळी, दौलतवाडी, शिरूर आदी ठिकाणी नागरीकांशी भेटी घेऊन निवडणूक लढविण्याबाबत चर्चा केली. यावेळी त्यांच्यासोबत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव, विनोद पवार, युवक तालुकाध्यक्ष उमेश म्हानोर, अर्जुन पवार, किसनराव पवार यांच्यासोबत भेटी देऊन विधानसभा निवडणूक बाबत संवाद साधला



ॲड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव हे सध्या शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे कॉग्रेस पार्टी विधी सेल मराठवाडा प्रमुख आहेत, खा.शरद पवार यांच्या विचारसरणीला तळागाळात पोहचवण्याचे काम करीत असून, प्रत्योक निवडणूकीत शरद पवार हाच आपल्या पक्षाचा चेहरा हे मानून त्यांनी उमेदवार न बघता पक्षाच्या विजयासाठी खारीचा का होईना वाटा उचललेला आहे. ॲड.जाधव यांचे वडिल कै. ॲड.लक्ष्मणराव साहेबराव जाधव यांनी १९७८ पासून शरद पवार साहेबांसोबत काम केलेले आहे. पक्षाचे जिल्हा सरचिटणीस तथा जिल्हा उपाध्यक्षपदही त्यांनी भुषवलेले होते. तसेच पंचायत समितीचे उपसभापती व सभापती म्हणून त्यांची कारकिर्द उल्लेखनिय ठरली होती. तसेच जिल्हा नियोजन मंडळावर त्यांनी काम केले.

बीड जिल्हयातील अपात्र स्वातंत्र सैनिकांची केसमध्येसर्वोच्च न्यायालयापर्यंत वकिल म्हणुन काम पाहिले. न्यायमुर्ती पालकरआयोग वकिल म्हणुन काम केले. महितीचा अधिकार, जनहितार्थ याचिका, मूलभूत अधिकार यावर विविधि ठिकाणी शिबिरे घेऊन लोकजनजागृती केलेली आहे. तसेच पाटोदा पूलकम बंधारा,बोगस तांत्रिक मान्यता विरोधात जनहितार्थ याचिका, पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग (पालखी मार्ग) ची जनहितार्थ याचिका आदि प्रश्न न्यायालयाच्या समोर आणून दिलेले आहेत.ॲड.जाधव यांनी बीड जिल्हा परिषदेच्या स्टॅडिंग कॉन्सिल म्हणुन दहा वर्षे काम पाहिले.तर काही प्रकरणात महाराष्ट्र शासनाचे विशेष वकिल म्हणुन काम पाहिले आहे. सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांच्या बीड जिल्हयातील मंदिर,मज्जिद जमीनघोटाळा संदर्भात आरोपीवर गुन्हा नोंदवण्यासाठी मा. उच्च न्यायालयात याचिका चालवल्य असून, पाटोदा नगरपंचायत झालेला भ्रष्टाचार प्रकरणे मा. उच्च न्यायालयात जनहितार्थ याचिकेद्वारे सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम ॲड. जाधव हे करीत आहेत.

अँड.नरसिंह जाधव यांच्या या सर्व गोष्टी पाहता व पक्षासाठी केलेले काम पाहता आष्टी मतदार संघाला एक नव्या उमेदीचा कायदेतज्ञ सुशिक्षित उमेदवार मिळाला तर नक्कीच आष्टी पाटोदा सारखा मतदार संघात चेहरा मोहरा बदलल्याशिवाय राहणार नाही अशी जनमाणसात प्रतिमा असल्याने मतदारसंघातील जनतेचे पाठबळही त्यांच्या मागे सध्या मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने आपणास उमेदवारीच संधी मिळाल्यास आपण जनतेच्या प्रश्नासाठी निवडणूकीत उतरणार असल्याचे ॲड. जाधव यांनी सांगितले.

## पान ६ वरून...

### शिर्डी अधिवेशनास धारूर

समिती गठीत करण्यात आली आहे.या मंडळाच्या माध्यमातून पत्रकारांना छोटे मोठे उद्योग उभे करण्यासाठी अर्थसाह्य उपलब्ध करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पत्रकारांना कुठल्या प्रकारची सुरक्षा नसल्यामुळे ते असुरक्षित असून त्यांची राज्यस्तरावर पत्रकारांची १० लाख रुपयांची विमा पॉलिसी उतरविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तर अधिस्विकृतीसाठी १० वर्ष पत्रकारिता केली असल्याचा अनुभव ग्राह्य धरून सरसकट पत्रकारांना अधिस्विकृती देण्यात यावी अशी आग्रही मागणी त्यांनी केली.तसेच शंकरराव चव्हाण कल्याण निधीच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या पेन्शनच्या अटीमध्ये सलग ३० वर्षे एका दैनिकात काम करणे ही अट रद्द करावी व २० वर्ष पत्रकारितेची सेवा ग्राह्य धरावी असे त्यांनी सांगितले. सदरील बैठकीचे आयोजन धारूर येथील शासकीय विश्रामगृहावर करण्यात आले होते.यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रकाश काळे, संदिपान तोंडे, सूर्यकांत जगताप, सुनील कावळे ,तालुकाध्यक्ष सचिन थोरात, कार्याध्यक्ष अतुल शिनगारे, ईश्वर खामकर, नाथा ढगे,आतिक मोमीन, रवी गायसमुद्रे, अविनाश ठोंबरे, सुनील तोंडे, सतीश पोद्दार ,इरफान शेख, कैलास मुंडे,असलम शेख, विशाल सराफ, अविनाश जगताप, गोवर्धन बडे ,विठ्ठल वाघमोडे सह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### स्वामी विवेकानंद बाल विद्या

भाषणात मुलांना दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे महत्व पटवून दिले व आपल्या स्वयंपाकघरातही कशा प्रकारे विज्ञानाच्या प्रयोगांचा क्षणोक्षणी वापर होतो ते अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी फिरत्याा विज्ञान प्रदर्शनास उदंड प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक श्री. उल्हास रामदासी यांनी केले.

### माजलगावचा मयूर राऊत

डॉ. अशोकराव तिडके प्रा. निळकंठ साबळे प्रतापराव सोळंके व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी डॉ. यशवंतराव भोसले पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा शिवसेना तालुका प्रमुख तुकाराम येवले तालुका अध्यक्ष उमेश मोगरेकर पत्रकार कमलेश जाब्रस ईश्वर खुरपे सुरेश दळवे. भाजपा अल्पसंख्यांक आघाडीचे तालुका अध्यक्ष खयुम पठाण बाळासाहेब क्षीरसागर रसागर कैलास खुर्पे सत्यानारायण उनवणे राजाभाऊ सरोदे अँड मंन्मत लांडगे अतुल उगले बबनराव सरवदे दयानंद तोष्णीवाल अभय होके देवानंद शिंदे, अनंत जगताप इनायत खान पठाण सतीश दुगड तुळशीराम साबळे रामानंद लड्डा , कॉम्रेड मुसदिक बाबा ॲड .सय्यद याकूब महारुद्र कावळे यांनी केले.

### राष्ट्रवादी पक्ष शरद पवार

जोमाने कार्य करू असे शौकत पठाण यांनी दै.राज्य लोकतंत्रशी बोलताना सांगितले. यावेळी आसिफ खान, महादेव कोहक संदीप हाडे, संदीप रोकडे, बाबासाहेब ससे, सोमनाथ पवार, माधव साके, सचिन गव्हाणे हौसराव शिरसाट, अंबादास पिंपळे, जावेद

पठाण गणेश गव्हाणे, सोमनाथ पाचपुते, राजू माळी, अमोल सरोदे, सचिन गाडे, महेश पिंपळे, सागर गायकवाड, चंद्रकांत गव्हाणे,संदीप चव्हाण नेवसराव चव्हाण, विजय राठोड, चंद्रकांत वाघमारे, असलम पठाण, गणेश आडसरे, कैलास बर्डे, समीर पठाण आधी उपस्थित होते.

# नवा हंगाम तोंडावर तरीही सोयाबीनचे भाव स्थिरच



पुणे : गेल्या दहा महिन्यांपासून सोयाबीनचे भाव स्थिरावले आहेत. हमीभावापेक्षाही सातशे ते आठशे रुपयांनी सोयाबीनचे भाव कमी असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. तर येत्या एक ते दीड महिन्यात नवीन सोयाबीन बाजारात दाखल होणार असतानाही दरांमध्ये काहीही बदल दिसून येत नसल्याने चिंतासुद्धा वाढलेली आहे.

शासनाकडून २०२४-२५ या खरीप हंगामासाठी ४८९२ रुपये सोयाबीनचा हमीभाव जाहीर केला आहे. बाजार समितीमध्ये चार हजार ते ४२५५ दरम्यान सोयाबीन विक्री होत आहे. सोयाबीनची आवक दोन हजार क्विंटलपर्यंत झाली होती. हमीभावापेक्षाही कमी भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. किमान हमीभाव तरी मिळावा अशी अपेक्षा शेतकऱ्याकडून व्यक्त केल्या जात आहे. मागील हंगामात सोयाबीन हाती आल्यानंतर थोडे दिवस पाच हजारांच्या दरम्यान सोयाबीनला भाव मिळाला होता. त्यानंतर आता जवळपास दहा महिन्यांचा कालावधी लोटला असला तरी भावामध्ये अपेक्षित वाढ झाली नसल्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केल्या जात आहे. मागील दोन-तीन दशकांपासून सोयाबीन शेतकऱ्यांचे मुख्य पीक झाले असून सोयाबीनवरच शेतकऱ्याचे अर्थकारण अवलंबून आहे. आज ना उद्या भाव वाढतील या आशेवर शेतकऱ्यांनी सोयाबीन राखून ठेवले आहे. काही शेतकऱ्यांनी सोयाबीनवर तारण कर्ज घेतले आहे. तारण कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे तर पार कंबरडे मोडले आहे. तब्बल दहा महिन्यांचा कालावधी उलटला असला तरी अजूनही सोयाबीनचे भाव ४००० ते ४३०० दरम्यानच असल्यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. नवीन सोयाबीन एक ते दीड महिन्यात घरात येणार असल्यामुळे आता मात्र शेतकरी सोयाबीन भाव वाढीची आशा सोडून विक्री करीत आहेत.

### दर आणि वजन कमी झाल्याचा फटका

भाव कमी तसेच सोयाबीनचे वजनही घटल्यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी मार बसला आहे. भाववाढ होत नसल्यामुळे नाइलाजाने मिळेल त्या भावात सोयाबीनची विक्री करीत आहेत. परिणामी बाजार समितीमध्ये सोयाबीनची आवक वाढल्याचेही चित्र आहे. सोयाबीनचा हमीभाव ४८९२ असला तरी हमीभावापेक्षा तब्बल ७०० ते ८०० रुपयांनी सोयाबीन कमी दराने विकल्या जात आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

इ.स.पू. ३११४ : मेसोअमेरिकन लॉन्ग कॅलेंडर सुरु झाले.
१८७७ : अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ हॉल यांनी मंगळाच्या फोबॉस व डिमॉस या चंद्रांचा शोध लावला.
१९४३ : सी. डी. देशमुख हे 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया'चे पहिले भारतीय गव्हर्नर झाले.
१९५२ : हुसेन बिन तलाल जॉर्डनचे राजे बनले.
१९६० : चाडला (फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९६१ : दादरा व नगर हवेली हा भाग भारताचा केन्द्रशासित प्रदेश बनला.
१९७९ : गुजरातेतील मोर्वी येथे धरण फुटून हजारो लोक मृत्यूमुखी पडले.
१९८७ : 'युनायटेड स्टेट्स फेडरल रिझर्व्ह'च्या अध्यक्षपदी ॲलन ग्रीनस्पॅन यांची निवड झाली.
१९९४ : अफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या व डॉ. नेल्सन मंडेला यांच्या निकटवर्ती सहकारी डॉ. फातिमा मीर यांना 'विश्वगुर्जरी पुरस्कार' जाहीर
१९९९ : शतकातील शेवटचे खग्रास सूर्यग्रहण झाले.
१९९९ : बारा वर्षाखालील मुलांच्या राज्यस्तरीय जलद बुद्धीबळ स्पर्धेत नवी दिल्ली येथील सहा वर्षे वयाच्या परिमार्जन नेगी याने विजेतेपद पटकावले. ही स्पर्धा जिंकणारा आजवरचा तो सर्वात छोटा खेळाडू आहे.
२००३ : नाटो अफगाणिस्तानमधील शांती सैन्याची कमान हाती घेतली, ते नाटोचे ५४ वर्षांच्या इतिहासात युरोपबाहेरील पहिले मोठे ऑपरेशन आहे.
२०१३ : डॉ. सुब्रम्हण्यम स्वामी यांच्या जनता पक्षाचे भारतीय जनता पक्षात विलीनीकरण झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७८ : जर्मन व्यायामशाळेचे शिक्षक आणि राष्ट्रवादी फ्रेडरिक लुडविग जॉन यांचा जन्मदिन.
१८९७ : एनिड ब्लायटन बालसाहित्यासाठी प्रसिद्ध असलेल्या इंग्लिश लेखिका (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९६८)
१९११ : प्रेम भाटिया पत्रकार, संपादक, राजकीय विश्लेषक आणि मुत्सद्दी (मृत्यू: ८ मे १९९५)
१९२८ : रामाश्रेय झा संगीतकार, वादक व शास्त्रीय संगीतातील विद्वान (मृत्यू: १ जानेवारी २००९)
१९२८ : विनायक सदाशिव तथा वि. स. वाळिंबे लेखक व पत्रकार (मृत्यू: २२ फेब्रुवारी २०००)
१९४३ : जनरल परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे १० वे राष्ट्राध्यक्ष
१९४४ : फेडएक्स कंपनीचे संस्थापक, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी फ्रेडरिक स्मिथ यांचा जन्मदिन.
१९४९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ, सेंट्रल बँकर आणि निवृत्त आयएएस अधिकारी तसचं, भारतीय रिझर्व्ह बँकचे माजी २२ वे गव्हर्नर दुव्वरी सुब्बाराव यांचा जन्मदिन.
१९५४ : यशपाल शर्मा क्रिकेटपटू
१९५४ : क्रिकेटपटू यशपाल शर्मा यांचा जन्म.
१९५० : ॲपल इन्क कंपनीचे सहसंस्थापक स्टीव्ह वोजनियाक यांचा जन्म.
१९७४ : अर्जुन पुरस्कार सन्मानित माजी भारतीय क्रिकेटपटू व कर्णधार अंजू जैन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०८ : खुदिराम बोस क्रांतिकारक (जन्म: ३ डिसेंबर १८८९)
१९७० : इरावती कर्वे साहित्य अकादमी व महाराष्ट्र शासन पुरस्कार विजेत्या मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व शिक्षणतज्ञ (जन्म: १५ डिसेंबर १९०५)
१९९९ : रामनाथ पारकर क्रिकेटपटू (जन्म: ३१ आक्टोबर १९४६)
२००० : पी. जयराज मूकपटांच्या जमान्यापासून हिन्दी चित्रपटसृष्टीचे साक्षीदार असलेले दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (१९८०) अभिनेते (जन्म: २८ सप्टेंबर १९०९)
२००३ : अर्मांड बोरेल स्विस गणितज्ञ (जन्म: २१ मे १९२३)
२०१३ : भारतीय पक्षीशास्त्रज्ञ आणि लेखक जफर फटहॅली यांचे निधन. (जन्म: १९ मार्च १९२०)

## ओरिसा येथे सुरू झाले पहिले 'धान्याचे एटीएम'




भूवनेश्वर : आतापर्यंत पैशाचे एटीएम बघितले आहे. परंतु आता धान्याचे एटीएम सुद्धा सुरू झाले आहेत. ओरिसा या राज्यात पहिले 'धान्याचे एटीएम' सुरू झाले असून सार्वजनिक वितरण प्रणालीच्या लाभार्थ्यांना २४ तास केव्हाही आणि कोणत्याही दिवशी याचा लाभ घेता येणार आहे. 'अन्नपूर्ती ग्रेन एटीएम' चे भुवनेश्वरमध्ये अन्न पुरवठा आणि ग्राहक कल्याण मंत्री कृष्ण चंद्र पात्रा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे.

भारतातील जागतिक अन्न कार्यक्रमाचे उप-देश संचालक नोझोमी हाशिमोटो यांनी सह भागीदारीत महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणून ही मशीन त्यांना पाठवली असे कृष्ण चंद्र पात्रा यांनी सांगितले. डब्ल्यूएफपीच्या भागीदारीतील धान्य वितरण यंत्राचे वर्णन करताना, पात्रा म्हणाले की यामुळे राज्यात पोषण सुरक्षा प्राप्त करण्यास मदत होईल. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत २४७ प्रवेशासह लाभार्थ्यांना अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासाठी योग्य वेळी राज्यभर एटीएमची स्थापना केली जाईल, असेही मंत्री कृष्ण चंद्र पात्रा यांनी सांगितले. प्रत्येक जिल्ह्यात किमान एक आणि त्यानंतर राज्यातील प्रत्येक ब्लॉकमध्ये अशी किमान एक सुविधा उभारण्यात येईल असेही ते म्हणाले. यावेळी हाशिमोटो म्हणाले की "ओरिसाने मिळवलेले यशाची जागतिक पातळीवर नोंद होणार. अनेक राज्यांमध्ये कार्यरत असलेले जागतिक स्तरावर पुरस्कृत केलेले अन्नपूर्ती सोल्यूशन पाहून आम्हाला आनंद झाला आहे. वर्षभर चालणारे पायलट आणि चाचण्या यामुळे अधिक कार्यक्षम वैशिष्ट्ये असलेली प्रणाली विकसित होत आहे" वैध पीडीएस रेशनकार्ड असलेले कोणीही, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील लोक त्यांचे बायोमेट्रिक प्रमाणीकरण करून या तंत्राचा लाभ घेऊ शकतात. या मशीनमध्ये फक्त ०.०१ टक्के त्रुटी आहे. पाच मिनिटांत ५० किलो पर्यंत धान्य वितरित करण्याची क्षमता या मशीनमध्ये आहे.

## सोयाबीन नुकसान पातळी वाढली

खानदेशात कापसासह आता सोयाबीनचेही अतिपावसाने नुकसान होत आहे. शासनाच्या पीकविमा योजनेत सहभागी शेतकरी पीकविमा योजनेतून भरपाईसाठी पोर्टलवर तक्रारी नोंदवीत आहेत.

अतिपावसात कापसाची वाताहत होत आहे. सोयाबीन पिकाची वाढही खुंटली आहे. यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. काळ्या कसदार जमिनींत पीक जोमात होते. परंतु सध्या पिकाची स्थिती बिकट आहे. पाऊस मागील ३० ते ३५ दिवसांपासून सतत सुरू आहे. यामुळे पिकात कुठलीही फवारणी घेता आली नाही. तसेच तणही वाढले. सखल भागात पाणी कायम राहिल्याने पीक पिवळे, लाल पडले असून, त्याचे १०० टक्के नुकसान आजघडीला अनेक भागात झाले आहे. शासनाकडून नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. यात पीकविमा योजनेत सहभागी झालेले शेतकरी नुकसान भरपाईसाठी विमा योजनेच्या पोर्टलवर तक्रारी नोंदवीत आहेत. खानदेशात तीन विविध कंपन्या खरीप पीकविमा योजनेसंबंधी कामकाज करीत आहेत. विमा कंपनीकडे तक्रार नोंदविल्यानंतर संबंधितांकडून पंचनामा केला जाईल. यानंतर नुकसान पातळी किती आहे, हे विमा कंपनी निश्चित करील. सध्या महसुली कर्मचारी महसूल सप्ताह व अन्य कार्यक्रमांत व्यस्त आहेत. तर कृषी सहायकांची संख्या कमी आहे. यामुळे विमा कंपनीचे प्रतिनिधी पंचनामे करताना शासकीय यंत्रणेशिवाय दाखल होत आहेत. दुसरीकडे अनेक तालुक्यांत घरगोठ्यांची हानीही झाली आहे. तसेच शिवारातही नुकसान दिसत आहे. यामुळे शेतकरी यासंबंधी पंचनामे करून घेत आहेत. याच वेळी विमा कंपनीचेही पंचनामे सुरू झाल्याने यंत्रणांचाही गोंधळ होत आहे. परंतु पंचनाम्यांना उशीर व्हायला नको यासाठी विमा कंपन्या आपल्या यंत्रणेच्या मदतीने योग्य ती माहिती संकलित करून पुढील कार्यवाही वरिष्ठांच्या सूचनेनुसार करीत आहेत. खानदेशात यंदा सोयाबीनची पेरणी सुमारे ४० हजार हेक्टरवर झाली आहे. जळगाव जिल्ह्यातील क्षेत्र ३१ हजार हेक्टरपर्यंत आहे. कापसासह आता सोयाबीन नुकसानीच्या तक्रारी विमा कंपनीकडे दाखल होत असल्याने कंपनीचीही दमछाक पुढे होईल, अशी स्थिती आहे. सुमारे १५०० तक्रारी सोयाबीन नुकसानीसंबंधी दाखल झाल्या आहेत. या तक्रारी तातडीने निकाली काढून शेतकऱ्यांना परतावे दिले जावेत, अशी मागणीही केली जात आहे. मागील वर्षी कोरड्या दुष्काळाने पिकाची हानी झाली. यंदा ओला दुष्काळ आहे. यामुळे शासनाने सरसकट भरपाईसाठी कार्यवाही करावी, पंचनामे करून घ्यावेत, विमा कंपनीलाही सरसकट पंचनामे करण्यासंबंधी ताकीद दिली जावी, अशी मागणीही केली जात आहे.



## मिरची वरील लिफ कर्ल वायरस नियंत्रणाची माहिती

महाराष्ट्र राज्यात मिरची हे एक प्रमुख भाजीपाला तसेच मसाल्याचे पीक आहे. आजकाल सर्व मिरची उत्पादक शेतकरी एका मोठ्या समस्येने ग्रस्त असतात. ही समस्या म्हणजे मिरची पिकावर लिफ कर्ल व्हायरसचा अटॅक होय. या रोगाला महाराष्ट्रातील विविध भागात विविध प्रकारचे नाव आहेत जसे की,चुरडा मुरडा,घुबड्या, बोकड्या इत्यादी नावाने हा रोग ओळखला जातो. हा रोग विषाणूजन्य असून या रोगावर कुठलाही प्रकारचा उपाय नसून हा रोग येऊच नये यासाठी उपाययोजना करणे फार महत्त्वाचे असते.

लिफ कर्ल वायरसचे परिणाम : पानांच्या कडा वरच्या दिशेने मुडपतात. शिरा पिवळ्या पडतात. पानांचा आकार कमी होतो. झाडांची वाढ खुंटते. जुनी पाने खरबडीत आणि जाड होतात. फळांची गुच्छ लहान आकाराची होतात. मिरचीवरील चुरडा मुरडा रोगाचा प्रादुर्भाव प्रथम रोपवाटिकेत होतो. या रोपांची आपल्या शेतात लागवड केल्यानंतर १० ते १५ दिवसात म्हणजे जुलै-ऑगस्टमध्ये प्रादुर्भावास

सुरुवात होते. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यामध्ये हा रोग शेतभर पसरतो. रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाल्याने व त्यांचे नियंत्रण होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना पीक सोडून द्यावे लागले.

व्हायरस चे स्वरूप : या रोगाचा प्रसार प्रामुख्याने फुलकिडे,मावा, तुडतुडे,पांढरी माशी इत्यादी रसशोषक किडी मार्फत होतो. जेव्हा या किडींचा प्रादुर्भाव मिरचीच्या झाडावर होतो तेव्हा विषाणू रसासोबत किडींच्या शरीरात प्रवेश करतो.



पुढे निरोगी वनस्पतीवर या किडी रस शोषण करताना हा विषाणू निरोगी झाडांमध्ये प्रवेश करतो.

मिरची वरील वायरससाठी एकात्मिक उपाय : मिरची लागवड करण्यापूर्वी तयार रोपांच्या निर्मिती करिता वापरण्यात येणारे बियाणे खात्रीशीर व दर्जेदार असल्याची खात्री करावी. रोपवाटिकेच्या चारी बाजूने नेट किंवा कपडा बांधावा. जेणेकरून बाहेरील रसशोषण करणाऱ्या किडी रोपवाटिकेमध्ये येऊ शकणार नाहीत. या रोगाचा प्रसार रसशोषक किडी मार्फत होतो. त्यामुळे आपण शेतात १० निळे चिकट सापळे आणि १० पिवळे चिकट सापळे लावावेत. अतिरिक्त पाण्याचा आणि अन्नद्रव्यांचा वापर टाळावा. जेणेकरून रसशोषक किडींचा प्रादुर्भाव जास्त होणार नाही. शेताच्या चारही बाजूला किंवा मिरची पिकामध्ये तीन ओळींनंतर मका,ज्वारी,चवळी इत्यादी सापळा पिकांची लागवड करावी. लागवडीकरिता प्लॅस्टिक मल्चिंगचा वापर केल्यास पांढऱ्या माशीचे प्रमाण कमी राहते. मिरची पिकामध्ये तण काढून स्वच्छता ठेवणे फार महत्वाचे आहे. सुरुवातीच्या अवस्थेमध्ये नीम तेलाची २ मिली प्रति लिटर प्रमाणे फवारणी करावी.

रासायनिक उपाययोजना : पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी १० ग्रॅम डायफेनथुरॉंन ५० डब्ल्यू पी (पेगासस, सिजेंटा) प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मावा, तुडतुडे यांच्या नियंत्रणासाठी ४ ग्रॅम थायमेथोक्झाम (ॲक्टरा, सिंजेटा) किंवा ४ मिली इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल (कॉन्फिडोर, बायर) प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. रीजंट, बायर (फिप्रोनील ५ एस. सी). १५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अपेक्स ५०, क्रिस्टल क्रॉप सायन्स ( इमामेक्टीन बेन्झोएट १.५ %+ फिप्रोनिल ३.५ % एस. सी.) २५ मिली /१० लिटर पाणी. वरील कीटकनाशकांचा गरजेनुसार आलटून-पालटून फवारण्या घ्याव्यात. फवारणी ही सकाळी ११ च्या आत किंवा सायंकाळी ४ च्या नंतर करावी. फवारणी साठी योग्य पीएच चे म्हणजेच ६.५ ते ७.५ चे पानी वापरावे. फवारणी करताना जमिनीत ओलावा असेल याची काळजी घ्यावी. वारे जर जास्त वेगाने वाहत असेल तर फवारणी घेऊ नये. फवारणी द्रावण तयार करताना एक घटक पाण्यात टाकून पानी २ मिनिट चांगले ढवळावे व नंतर दूसरा घटक मिसळावा. म्हणजेच एकदम सर्व घटक पाण्यात मिसळू नये. फवारणी करताना स्टीकर चा अवलंब अवश्य करावा.

## जाणून घ्या हळद काढणीची पद्धत



लागवडी पासून ८ ते ९ महिन्यात हळद काढणीस येते. हळद पूर्णपणे तयार झाल्यानंतर तिची पाने पूर्णपणे पिवळी पडून खाली पडतात, मग तुम्ही समझू शकता की हळद काढणीस तयार आहे. अंदाजे काढणी ही फेब्रुवारी ते एप्रिल महिन्यापर्यंत चालते. काढणीची तारीख ठरल्यानंतर जमिनीला १५ दिवस अगोदर पाणी देणे बंद करावे. पाणी एकदम बंद न करता हळू हळू बंद करावे. पण जमीन जास्तच वाळली असल्यास काढणी करताना जमिनीस हलकेसे पाणी द्यावे, कारण हलकासा ओलावा असेल तर काढणी करणे हे सोप्पे राहते. सुरुवातीला वरील सर्व पाने जमिनीलागत कापून घ्यावीत. नंतर कुदळीच्या किंवा ट्रॅक्टर अवजाराच्या मदतीने हळद काढणे सुरू करावे. काढणी झाल्यानंतर जमीन तशीच २ ते ३ दिवस उन्हात तापू द्यावी जेणे करून कंदावरील माती वाळून जाईल व कंद खाली आपटल्यानंतर लगेच वेगळी होईल. कंद खाली आपटून जेठे गड्डे, बगल गड्डे, हळकुंडे, सोरा गड्डा, कुजकी सडलेली हळकुंडे अशा प्रकारे हळदीची प्रतवारी करावी. फक्त हे करताना कंदाला इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. याच्यामधून आपल्याला प्रती एकरी १३० ते १५० क्विंटल ओल्या हळदीचे तर २५ ते ३० किलो वाळल्या हळदीचे उत्पादन मिळते. हळद काढणी नंतर १५ दिवसाच्या आत प्रक्रिया करावी. यामुळे रिकवरी आणि हळदीची क्वालिटी चांगली भेटते.

# वैनगंगा-नळगंगा पाठोपाठ आता नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला राज्यपालांची मंजुरी

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ट्विट करून माहिती, शेकडो गावांना होणार फायदा

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला काहीच दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. त्यापाठोपाठ आता नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला राज्यपालांनी मंजुरी दिल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. याबाबत फडणवीस यांनी शनिवारी (दि.१०) ट्विट केले आहे. मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील पाणी नेण्यात येईल. यासाठी राज्यातील महायुती सरकारने नदीजोड प्रकल्पा हाती घेतल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता.



फडणवीस यांनी, उत्तर महाराष्ट्रातील महत्वाचा असणाऱ्या नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्पाला महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मंजुरी दिल्याचे म्हटले आहे. हा प्रकल्प महत्वाचा असून गेल्या ५० ते ६० वर्षापासून चर्चेत आणि प्रतिक्षेत आहे. पण आता राज्यपालांनी वैनगंगा-नळगंगा पाठोपाठ या प्रकल्पाला मंजुरी दिली. त्याबद्दल राज्यपालांचे मनापासून आभार मानत असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. तसेच फडणवीस यांनी, नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्पातून गिरणा पश्चिमी वाहिन्या नदीखोऱ्यातून १०.६४ टीएमसी नाशिक आणि जळगाव जिल्ह्याला मिळेल. तर याचा थेट लाभ दोन्ही जिल्ह्यातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला होईल. तर हा प्रकल्प सुमारे ७०१५ कोटी रुपयांचा असून तो राज्याच्या जलसमृद्धीच्या दृष्टीने एक ऐतिहासिक पाऊल ठरणार असल्याचे फडणवीस म्हणाले. या योजनेमध्ये ९ धरणे प्रस्तावित असून यामधून २६०.३० दलघमी पाणी ऊर्ध्वगामी नलिकेद्वारे उपसा केला जाणार आहे. तर उपसा करण्यात आलेले पाणी चणकापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सोडण्याचा प्रस्ताव आहे. तसेच यासाठी ७९.९२ कि.मी. लांबीची सिंचन योजना प्रस्तावित आहे. ही योजना झाल्यास अनेक गावांना याचा लाभ मिळेल असेही फडणवीस यांनी म्हटले आहे.



## लाडक्या बहिणीला न्याय देणार-नितीन साखरे

बीड। प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी महिलांच्या सन्मानासाठी लाडकी बहीण योजना काढली असून या योजनेचा लाभ प्रत्येक महिलेला मिळावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते नितीन साखरे यांनी बीड शहरातील महिलांसाठी शिबिर आयोजित करून वार्ड क्रमांक दोन मधील महिलांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी पुढाकार घेतला आहे. लाडकी बहीण योजनेच्या विविध कागदपत्रांसाठी महिलांना शासकीय कार्यालयांमध्ये जाऊन कागदपत्र उपलब्ध करण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागत होते. यासाठी सामाजिक कार्यकर्ते नितीन साखरे यांनी वार्ड क्रमांक दोन मध्ये शिबिर आयोजित करून जवळपास एक ते दीड हजार महिलांचे लाडकी बहीण योजनेसाठी कागदपत्र उपलब्ध करून देत या महिलांना योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला आहे. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाने महिलांमध्ये उत्साह निर्माण केला असून महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते नितीन साखरे यांनी व त्यांच्या मित्र मंडळाच्या वतीने महिलांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिल्याबद्दल वार्ड क्रमांक दोन मधील महिलांनी नितीन साखरे यांचे आभार व्यक्त केले आहेत. सदरील शिबिर सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी सदरील शिबिरास भेट देऊन नितीन साखरे यांच्या पुढाकाराचे कौतुक करत महिलांना प्रोत्साहित केले. यामुळे बीड शहरातील वार्ड क्रमांक दोन मध्ये नितीन साखरे यांच्या बद्दल महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली असून सामाजिक कार्यकर्ते नितीन साखरे यांचे महिलांनी आभार व्यक्त केले आहेत.

## बालरंगभूमी परिषदेच्या बीड शाखेतर्फे छत्री रंगवा महोत्सवाला उदंड प्रतिसाद

बालकांच्या जीवनात रंगीबेरंगी चित्र निर्माण होण्यासाठी हा उपक्रम -डॉ.दीपा क्षीरसागर



बीड । प्रतिनिधी

बालकांच्या भावविश्वात रंगीबेरंगी चित्र निर्माण व्हावे, त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, रंगाशी खेळता यावे यासाठी छत्री रंगवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात प्रशिक्षण देवून स्पर्धा घेत बालचित्रकारांचा उत्साह वाढवला. तब्बल १०० बालचित्रकारांनी स्वतः छत्री रंगवली आपल्या कल्पनेतील चित्र त्यांनी रंगवले, असे प्रतिपादन बालरंगभूमी परिषदेच्या राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले. बीड शहरातील के.एस.के. महाविद्यालयाच्या प्रांगणात कार्यक्रमाचे उद्घाटन दोन बालकांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितीत नवगण शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, डॉ.सुधाकर गुट्टे डॉ.नारायण काकडे, प्रा.जालिंदर कोळेकर, डॉ.खान अन्सार उल्ला शफिउल्ला, डॉ.दुष्यंता रामटेके, मिलींद शिवणीकर, इंजिनिअर संतोष सानप, मुख्य प्रशिक्षक अमित गाडे, नामदेव साळूंके, डॉ.अनिता शिंदे, सुरेश साळूंके, श्रीकांत पुरी आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या की, बालकांच्या जीवनात रंगीबेरंगी रंगाचे भावविश्व निर्माण करण्यासाठी यासारख्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून आज मोबाईलच्या युगात मुलांच बालपण हिरावून गेले असून त्यांच्या नृत्य, नाट्य, संगीत, खेळणे बागडणे हे हरवले जात आहे. त्यामुळे मुलांच्या गुणांना वाव देण्यासाठी अशा स्पर्धा आयोजित करणे आवश्यक आहे. लहान मुलांचे जग सोनेरी, आनंदी होणे यासाठी छोटया चित्रकारांना पेंटिंगमधून त्यांच्या कला गुणांना, कल्पनेला वाव मिळेल यासाठी या स्पर्धेतून सहभागी बालकलावंताना बक्षीस दिली गेली. परंतु खर्या अर्थाने या स्पर्धेत सहभागी करून घेणे हे त्यांच्यासाठी मोठे बक्षीस मिळाल्यासारखे आहे. शहरातील विविध शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्यातील शाळा गुरूकूल इग्लींश स्कूल, पोतदार इनटरनॅशनल स्कूल, खांडेपारगाव हायस्कूल, चंपावती शाळा, चंपावती इंग्लिश स्कूल, संस्कार विद्यालय, नारायणा स्कूल, शिवाजी विद्यालय, भगवान विद्यालय, भगवान इंग्लिश स्कूल, माऊली प्राथमिक शाळा, पिंगळे विद्यालय, संभाजी विद्यालय, सैनिक स्कूल बीड, बोरफडी हायस्कूल बोरफडी, रामतिर्थ हायस्कूल, हजरत बालेपीर उर्दू स्कूल आदी शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले. याशिवाय वैयक्तीक बालचित्रकार देखील उपस्थित होते. या महोत्सवात प्रथम- आदित्य शंकर चव्हाण संस्कार विद्यालय बीड, द्वितीय- श्रावणी संतोष गोरे संस्कार विद्यालय बीड, तृतीय-मैथिली मिलींद शिवणीकर नारायण इ.टेक्नो.स्कूल ७ वी, उत्तेजनार्थ - प्रियल प्रविण ढगे पोदार स्कूल, काझी सिध्दीकी हजरथ बालेपीर, आदिती अभिषेक देशमाने पोदार स्कूल, श्रेयस राऊत, समृध्दी श्रीकांत साळूंके गुरूकुल स्कूल, कामरान हसन सैनिकी विद्या, अनघा रविंद्र आदे चंपावती विद्यालय, दिप्ती दिपक राऊत चंपावती विद्यालय यांना नवगण शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या हस्ते बक्षीसाचे वितरण करण्यात आले. तसेच, रंगवलेल्या छत्र्या व सर्वांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले. या महोत्सवात एकूण शंभर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक म्हणून समीक्षा राऊत, शर्वरी जोगदंड, तनिषा हिरण, साक्षी सपकाळ, गायत्री जव्हेरी, शिवाणी वरपे, पल्लवी स्वामी, मानस गुळवेलकर, किरण वाघमारे, जानवी गालम, अतुल चौरे, ऐश्वर्या साळूंके, बाळासाहेब कांबळे यांनी विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून चित्र काढण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बालकलावंत, पालक उपस्थित होते.

## कोळगाव जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

### सिमा ओस्तवाल यांच्या गुरु आनंद महिला प्रतिष्ठानचा पुढाकार

कोळगाव । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील कोळगाव येथील जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले गुरु आनंद महिला प्रतिष्ठान व प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने हा स्तुत्य उपक्रम दि.०८ ऑगस्ट रोजी राबवण्यात आला.यावेळी बोलताना सांगितले की, सामाजिक क्षेत्रात काम करताना विशेष म्हणजे ग्रामीण भागात महिलांना अनेक अडचणींवर मात करून काम करावे लागते असे आयोजक सौ.सिमा ओस्तवाल यांनी मनोगत व्यक्त केले.



गेवराई तालुक्यातील कोळगाव येथील इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या जिल्हा परिषद शाळेतील १८५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रत्येकी चार रजिस्टर पेन खोट रबर शॉप नर आदी शैक्षणिक साहित्य दिनांक ०८ ऑगस्ट २०२४रोजी वाटप करण्यात आले हा स्तुत्य उपक्रम राबवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ता सीमा ओस्तवाल यांनी विशेष प्रयत्न केले त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आज शिक्षण घेणे काळाची गरज आहे. शिक्षणामुळे उच्च पदापर्यंत जावू शकता. यासाठी शिक्षणाला महत्त्व द्यावे. गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने मागील सात ते आठ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहे. ग्रामीण भागातील मुलींना रोजगाराभिमुख करिअर शिक्षण देवून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. मार्गदर्शन करणे, परिक्षा नियोजन, शिक्षणासाठी करिअर, गोरगरीब गरजूंना जीवनावश्यक साहित्यांचे वाटप केले जाते याचबरोबर सिरसमार्ग कोळगाव परिसरात शालेय विद्यार्थ्यांना मदत केली जाईल असे आश्वासन सिमा यांनी सांगितले. यावेळी सरपंच अनिता कदम, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष शरद बारहाते, जेष्ठ नागरिक मदनराव घाडगे, लक्ष्मण हिंदोळे, राजेंद्र कदम, राहुल लोंढे, बाळासाहेब घाडगे, कुंडलिक येडे, किशोर पारख, सुरेश जाधव, रुद्रा येडे, संतराम जोगदंड, ताराचंद करांडे, गोविंद रासकर, विष्णूपंत जगदाळे, अर्जुन जाधव,अक्षय हजारे, किरण जाधव, नानासाहेब ढवाण, तात्यासाहेब तळेकर, जि प शाळेचे शिक्षक शिक्षिका यांची उपस्थिती होती. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्र प्रमुख शेळके, मुख्याध्यापक गायकवाड, सोनवणे, जोगदंड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## माजी मंत्री क्षीरसागर यांचा ग्रामीण भागात झंझावात

### गावागावात जल्लोषात स्वागत तर मतदारांशी संवाद

बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी बीड विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बीड मतदारसंघात संपर्क दौरा सुरु केला आहे. मागच्या दोन दिवसात त्यांनी रायमोहा, लिंबागणेश आदी गटांमधील सुमारे २९ गावांना भेटी दिल्या आहेत. गेल्या महिनाभरात प्रत्येक सर्कल त्यांनी पिंजून काढला आहे. आतापर्यंत त्यांनी २०० गावांना भेटी दिल्या आहेत. आजच्या या दौर्यामध्ये ते नव्या-जुन्या कार्यकर्त्यांसोबत संवाद साधत आहेत. त्यांच्या संपर्क दौर्याला उत्तम प्रतिसाद मिळत असून काही गावांमध्ये तर त्यांचे डफडे वाजवून स्वागत होत असल्याचे चित्र आहे.



लोकसभा निवडणुकी दरम्यान बीडमधील राजकीय, सामाजिक वातावरण ढवळून निघाले होते. त्याचे पडसाद अजूनही अनेक ठिकाणी उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आता संपर्क दौर्याला सुरुवात केली आहे. ग्रामीण भागात जाऊन नव्या-जुन्या कार्यकर्त्यांच्या भेटी घेणे, छोटेखानी बैठकांमधून त्या गावात काय विकासकामे झाली, काय राहिली याची चर्चा करणे आणि विधानसभेच्या आगामी निवडणुकांच्या संदर्भाने चर्चा करणे असा कार्यक्रम मागील काही दिवसांपासून जयदत्त क्षीरसागर यांनी हाती घेतला आहे. त्यांच्या काळात अनेक गावांमध्ये राबविण्यात आलेल्या योजनांची आठवण या निमित्ताने ग्रामस्थ काढतात. तसेच काही प्रकल्प अर्धवट राहिले त्याची खंत असून आगामी काळात संधी मिळाल्यास ते पूर्ण करण्याचे आश्वासन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर गावागावात देत आहेत. शुक्रवारी जयदत्त क्षीरसागर लिंबागणेश जिल्हा परिषद गटामध्ये होते. जयदत्त क्षीरसागरांच्या राजकीय जीवनाची सुरुवात जेथून झाली तो हा जिल्हा परिषद गट असल्याने या गटामध्ये जयदत्त क्षीरसागर यांचे कार्यकर्त्यांशी असणारे संबंध चांगले आहेत. यातूनच अनेक गावांमध्ये जयदत्त क्षीरसागर यांचे डफडे वाजवून, तोफांची सलामी देत गावात मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले.



## वैद्यकीय मदत कक्षाकडून अपघातग्रस्ताला मदत

बीड । प्रतिनिधी

संतोष दहिभाते यांचा काही दिवसांपुर्वी अपघात झाला होता. त्यामध्ये त्यांना चेहर्याला व पायाला गंभीर दुखापत झाली. त्यांना प्रथमोपचार करण्यासाठी जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले.

त्यानंतर त्यांनी माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या वैद्यकीय मदत कक्षाशी संपर्क साधून मदतीची मागणी केली. त्यांना जिल्हा रूग्णालयातून तात्काळ खाजगी रूग्णालयात दाखल करून त्यांच्यावर महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत मोफत उपचार करून त्यांच्या पायाची व चेहर्याची शस्त्रक्रिया करण्यात आली. शनिवार दि.१० रोजी त्यांना रूग्णालयातून सुट्टी देण्यात आली. सिध्दीविनायक रूग्णालयाचे अस्थिरोग तज्ञ डॉ.जीवन चव्हाण यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली. तसेच माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर व वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख विजय देवमाने यांचे रूग्णांच्या नातेवाईकांनी आभार मानले.

# क्रेडाई महाराष्ट्राची ग्रामीण अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना जॉबची हमी - डॉ.धर्मवीर भारती

## सिव्हिल इंजीनिअरिंगला ॲडमिशन घ्या व जॉब ऑफर लेटर मिळवा; क्रेडाई महाराष्ट्र व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंबाजोगाईचा कौतुकास्पद उपक्रम

अंबाजोगाई। प्रतिनिधी

क्रेडाई महाराष्ट्र व कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अंबाजोगाईचा स्थापत्य विभाग यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. त्यानुसार सिव्हिल इंजीनियरिंगला ऍडमिशन घ्या व पहिल्याच दिवशी जॉब ऑफर लेटर मिळवा हा संयुक्त उपक्रम राबविण्यात आला. तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील नवीन करिअरच्या संधी हा कार्यक्रम ही आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास उपस्थित मराठवाड्याच्या विविध भागातून आलेल्या २३ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते जॉब ऑफर लेटर देण्यात आले.

प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांनी सांगितले की, क्रेडाई महाराष्ट्र व एम.बी.ई.एस कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अंबाजोगाईचा स्थापत्य विभाग यांच्या मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे नुकताच दि.१८ जुलै २०२४ रोजी चार वर्षांचा सामंजस्य झाला. त्याच अनुषंगाने कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अंबाजोगाई येथे रविवार, दिनांक ४ ऑगस्ट २०२४ रोजी बी.टेक सिव्हिल इंजिनिअरिंगला ऍडमिशन घ्या व पहिल्याच दिवशी जॉब ऑफर लेटर मिळवा तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील नवीन करिअरच्या संधी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे प्राचार्य डॉ.खडकभावी यांनी सांगितले. या कार्यक्रमात मराठवाड्याच्या विविध भागातून आलेल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. तसेच कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. काही विद्यार्थ्यांनी हा उपक्रम आमच्यासाठी सुवर्णसंधी असल्याचे मत व्यक्त केले. तर उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण २३ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते जॉब ऑफर लेटर देण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून क्रेडाई महाराष्ट्रचे सहसचिव डॉ.धर्मवीर भारती, क्रेडाई अंबाजोगाई शाखेचे संस्थापक अध्यक्ष संजय सुराणा हे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त प्रा.बी.जी.खिचडी (बिडवे इंजिनियरिंग कॉलेज, लातूर) हे होते. स्थापत्य विभागप्रमुख डॉ.व्ही.एस.राजमान्य यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. प्रस्ताविक करताना डॉ.राजमान्य यांनी प्रारंभी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अंबाजोगाईचा स्थापत्य विभाग यांच्या सातत्यपूर्ण उंचावणाऱ्या कामगिरीची नोंद घेवून सामंजस्य करार केल्याबद्दल क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रमोद खैरनार, राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाचे माजी सहसंचालक डॉ.अजित थेटे यांचे आभार मानले. पुढे बोलताना डॉ.राजमान्य म्हणाले की, सिव्हिल इंजीनियरिंगला ऍडमिशन घ्या व जॉब ऑफर लेटर मिळवा हा उपक्रम म्हणजे विद्यार्थ्यांसाठी एक सुवर्णसंधी आहे. त्याचा सर्वांनी आवश्य लाभ घ्यावा. याप्रसंगी बोलताना डॉ.धर्मवीर भारती म्हणाले की, पूर्ण जगाला स्थापत्य अभियांत्रिकीची ओळख भारतानेच करून दिली. २ हजार वर्षांपूर्वी अजिंठा वेरूळची लेणी हे एक त्याचे उत्तम उदाहरण आहे. क्रेडाई महाराष्ट्र हे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अंबाजोगाईच्या ग्रामीण अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना जॉबची हमी देतो असे आश्वासन डॉ.भारती यांनी दिले. आणि सिव्हिल इंजीनियरिंगला ऍडमिशन घ्या व जॉब ऑफर लेटर मिळवा या उपक्रमाचे कौतुक केले. व हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी आम्ही सदैव तयार आहोत असे डॉ.भारती यांनी सांगितले. या प्रसंगी बोलताना संजय सुराणा म्हणाले की, आज बांधकाम क्षेत्राकडे इतर विकसित देशाप्रमाणेच चांगल्या संधी उपलब्ध होत आहेत. कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अंबाजोगाईच्या सिव्हिल इंजीनियरिंगच्या विद्यार्थ्यांना फिल्ड ट्रेनिंग सोबत स्टायफंड देण्याची घोषणा श्री.सुराणा यांनी दिली. अध्यक्षीय समारोप करताना प्रा.बि.जी.खिचडी म्हणाले की, क्रेडाई महाराष्ट्र हे तरूण उद्योजकांना रियल इस्टेट क्षेत्राच्या सर्वांगिण वाढीसाठी सहकार्य करते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीला प्रवेश घेतल्यानंतर उपस्थिती व प्रात्यक्षिके (प्रॅक्टीकल) करणे जास्त गरजेचे आहे. सिव्हिल इंजीनियरिंगला ऍडमिशन घ्या व जॉब ऑफर लेटर मिळवा हा उपक्रम अभिनंदनीय असल्याचे प्रा.खिचडी यांनी सांगितले. तर कार्यवाहक प्राचार्य डॉ.एन.ए.रावबावले यांनी सिव्हिल इंजीनियरिंगला ऍडमिशन घ्या व जॉब ऑफर लेटर मिळवा या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करून क्रेडाई महाराष्ट्र यांचे आभार मानले. या कार्यक्रमास प्रा.एस.ए.बिराजदार, डॉ.बी.एस अलुरकर, टि.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य एल.व्ही.बगले यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्थापत्य विभागप्रमुख प्रा.पी.ए.वेदपाठक, एन.व्हि.मुंडे, जे.एम.चव्हाण, टी.आर.मोरे, ए.ए.गुळभिले, एन.ए.शेख, के.आर.जामकर आणि एम.टी.लाईदवार यांनी पुढाकार घेतला.




### २३ विद्यार्थ्यांना मिळाले जॉब ऑफर लेटर

क्रेडाई महाराष्ट्र व अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाईचा स्थापत्य विभाग यांच्यात नुकताच चार वर्षांचा सामंजस्य करार झाला. त्यानुसार सिव्हिल इंजीनियरिंगला ऍडमिशन घ्या व पहिल्याच दिवशी जॉब ऑफर लेटर मिळवा हा संयुक्त उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास उपस्थित मराठवाड्याच्या विविध भागातून आलेल्या २३ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते जॉब ऑफर लेटर देण्यात आले. या उपक्रमाचे विद्यार्थ्यांसह पालकांनी स्वागत केले.

### मराठवाड्यातून विद्यार्थ्यांचा सहभाग

बी.टेक सिव्हिल इंजिनिअरिंगला ऍडमिशन घ्या व पहिल्याच दिवशी जॉब ऑफर लेटर मिळवा तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील नवीन करिअरच्या संधी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मराठवाड्याच्या विविध भागातून आलेल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. काही विद्यार्थ्यांनी हा उपक्रम आमच्यासाठी सुवर्णसंधी असल्याचे मत व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

# महायुतीचे नेते पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे हेच उमेदवार ठरवणार; केजला राष्ट्रवादी का भाजप?

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पाश्वभूमीवर केज मतदारसंघात निवडणूक लढवण्याचा दावा करणाऱ्यांची भाऊगर्दी होत आहे.दरदिवशी कोणी ना कोणी पत्रकार परिषद घेवून ''मी पण निवडणूक लढवणार ''असे विधान करून राजकीय क्षेत्रात चर्चेचा विषय ठरत आहेत.

मात्र आगामी विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीचे मुख्य नेते आ.पंकजाताई मुंडे आणि आ.धनंजय मुंडे हे कोणाला उमेदवारी देणार याकडेच संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. केज मतदारसंघावर सध्या अनेकांनी दावेदारी सूरु केली आहे.जो तो उठून पत्रकार परिषद घेवून आमदारकीचे स्वप्न पाहत आहे.

गेल्या पंधरवडय़ात माजी आमदार सौ.संगिताताई ठोंबरे,शिवसेनेचे रामहरी राऊत, अंबाजोगाई शहरातील काँग्रेस पक्षाचे अनंत जगतकर यांनी पत्रकार परिषद घेवून निवडणूक लढवणार असल्याचे ठासून सांगितले.तर दुसरीकडे सेवानिवृत्त इंजिनिअर शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस चे सर्वे सर्वा शरद पवार, जयंत पाटील यांची भेट घेवून उमेदवारी मागितल्याची चर्चा सूरू आहे.एकंदरीत केज मतदारसंघात इच्छुकांची भाऊगर्दी होत असली तरी महायुती आणि महाविकास आघाडीचे नेते जे ठरवतील त्यांनाच उमेदवारी मिळेल असे चित्र सध्या तरी दिसत आहे.



परळी आणि केज मतदारसंघात उमेदवार कोण?आतापासूनच चूरश लागली आहे.

महायुतीतील भाजप,राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट),शिवसेना (शिंदे गट) या तीन प्रमुख पक्षांतील नेत्यांनी बैठकीवर भर दिला आहे.कोणाला किती जागा मिळतील यांचा अंदाज अद्यापही अधिकृत सुत्रांकडून नसताना ''माझी उमेदवारी फिक्स'' आहे. अशी राजकीय पेरणी काही विद्यमान आमदारांनी सोशल मीडियावर सूरू केली आहे.मात्र कोणता मतदारसंघ कोणत्या पक्षाला सुटेल हे ठरले नसताना ''मलाच उमेदवारी मिळणार'' हे म्हणणे घाईचे नाही का? अशी ही चर्चा मतदार करत आहेत. सध्या परळी मतदारसंघात शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बबन गित्ते हे एकमेव दावेदार असताना सौ.सुदामती गुट्टे आणि नुकतेच जयंत पाटील यांची भेट घेऊन राष्ट्रवादीत प्रवेश करणारे डॉ.माधव जाधव या दोन नेत्यांनी सुध्दा आमदारकी लढवण्याची तयारी दर्शवत लोकांच्या गाठीभेटींवर भर दिला आहे.बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात कोणता उमेदवार उभा करायचा हे विरोधी पक्षांना आव्हानात्मक ठरणार आहे.त्यामुळे परळी व केज मतदारसंघात कोण निवडून येईल या पेक्षा कोणाला कोणत्या पक्षाकडून उमेदवारी मिळते यांचीच उत्सुकता शिगेला पोहोचली असून सध्या याचीच चर्चा जोरदार होत आहे.

### भाजप की राष्ट्रवादी? केज मतदारसंघ नेमका कोणाला सुटणार?

महायुतीतील जागा वाटपाचा तिढा अद्यापही सुटलेला नसून केज मतदारसंघावर कोणत्या पक्षाची दावेदारी राहील? हे तूर्त तरी अधिकृत रित्या जाहीर करण्यात आले नाही.त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूकीत ट्विस्ट पाहायला मिळाले तर नवल नको.केज मतदार संघावर भाजपकडून माजी आमदार सौ.संगिताताई ठोंबरे व विद्यमान आमदार नमिता मुंदडा हे दोन आमदार वगळता आतापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दबदबा राहिला आहे.केज मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस ला मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे.सध्या शरद पवार गटाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत आपल्या कार्याची चुणूक दाखवून दिली.खासदार बजरंग सोनवणे यांच्या विजया नंतर वरीष्ठ नेते जयंत पाटील सह राष्ट्रवादीकाँग्रेस चे सर्वे सर्वा शरद पवार यांच्या अगदी जवळ रोमन साठे यांनी जवळीकता साधली आहे.लोकसभेच्या निवडणूकीत इमाने इतबारे प्रचार करून केज मतदारसंघात सर्वाधिक लोकप्रिय ठरले असल्याने रोमन साठे यांच्या सहानुभूती मध्ये वाढ झाली आहे.त्यामुळेच एकेकाळी राष्ट्रवादी पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या केज मतदारसंघात राष्ट्रवादी विरोधात राष्ट्रवादी अशी निवडणूक रंगेल काय? अशीही चर्चेला उधाण आले आहे.



बीड: जिल्ह्याचे नुतन जिल्हा पोलिस अधीक्षक अविनाशजी बारगळ साहेब यांनी पदभार स्वीकारला असता त्यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित शहर प्रमुख शेख निजाम भाई उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले,शिव अल्पसंख्याक सेलचे जिल्हाप्रमुख सय्यद नय्युम भाई,विनोद गूंड पाटील,दिपक घोडके पाटील, अजय आण्णा गायकवाड आदि.

## पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे –उगले

माजलगाव । प्रतिनिधी

मागच्या पंचवीस वर्षा पासूनच्या पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्यांसाठी वैशालीताई राणे यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या आझाद मैदान मुंबई येथील बेमुदत आंदोलनात माजलगाव तालुक्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान माजलगाव तालुका अध्यक्ष पांडुरंग उगले यांनी केले आहे



दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी बेमुदत आंदोलन, आझाद मैदान, मुंबई येथे संघटना च्या वतीने व वैशाली ताई राणे , भारती साळवी ,इक्बाल शेख व संजय पांडे यांच्या नेतृत्वाखाली बेमुदत आंदोलन करन्यात येणार आहे.महाराष्ट्र राज्य पदवीधर अंशकालीन कर्मचारी मागील २५ वर्षापासून त्यांच्या मागण्यांबाबत वेळोवेळी आंदोलन, आमरण उपोषण इ. संघटनेमार्फत केले असून आजपर्यंत निर्णय मार्गी लागलेला नाही. आम्हाला तात्काळ कायमस्वरुपी सेवेत घेण्याच्या प्रश्नाला न्याय द्यावा, या साठी महाराष्ट्र राज्यातील सर्व पदवीधर अंशकालीन कर्मचारी दिनांक १३.ऑगस्ट २०२४ पासून आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत आंदोलनाचा इशारा लेखी निवेदनातुन दिला आहे तरी माजलगाव तालुक्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचारी बंधूनी जास्तीत जास्त संख्येने या आंदोलनात सहभागी व्हावे असे आव्हान तालुका अध्यक्ष पांडुरंग उगले ( मो न ९४२००१८४५६ ) यांनी केले आहे

## कामगार न्यायालय यांच्या निर्णयानुसार कायम नियुक्ती द्यावी व वेतन वाढ करावी

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १२ ऑगस्टपासून उपोषणाचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

कामगार न्यायालयाच्या निर्णयानुसार माजलगाव नगर परिषदेमध्ये सफाई कामगार यांना कायम नियुक्ती देऊन त्यांचे वेतन वाढ करावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय समोर दिनांक १२ ऑगस्ट पासून उपोषण करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की आम्ही कामगार न्यायालय यांच्या निर्णयानुसार माजलगाव नगर परिषदेमध्ये सफाई विभागात रोजंदारीवर १९९३ पासून काम करीत आहोत तत्कालीन मुख्याधिकारी राठोड यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिनांक ३१/१० /२०१७ रोजी आमचा अहवाल पाठविला त्यानंतर तत्कालीन मुख्याधिकारी विशाल भोसले यांनी उपसंचालक न प प्रशासन वरळी मुंबई यांना ३० ऑगस्ट २०२१ रोजी आमचा अहवाल पाठविला कामगार न्यायालयांच्या निर्णयानुसार आमचे १९९७ पासून चे फरक देण्यात आलेले नाही आमचे माहे ऑगस्ट २०२३ ते सप्टेंबर २०२३ असे दोन महिने व जानेवारी फेब्रुवारी मार्च एप्रिल मे जून२० २४ असे आठ महिने देण्यात यावे व आमची वेतनवाढ ही करण्यात आली नाही आम्हाला न.प. मार्फत ९ हजार रुपये वेतन देण्यात येते यामध्ये आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नाही व आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे तत्कालीन मुख्याधिकारी यांनी पाठवलेल्या अहवालानुसार आम्हाला कायम शासकीय सेवेत घेऊन आमची वेतन वाढ करावी आम्ही कामगार खूप त्रस्त झालेलो आहोत आमच्यापैकी अनेकांना आजार असल्यामुळे दवाखान्यात उपचार घ्यायला पैसे नाहीत आमचा योग्य ते निर्णय घेऊन आम्हाला नगर परिषदेमध्ये कायम सेवेत घ्यावे व आमची वेतन वाढ करावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी बीड कार्यालयासमोर दिनांक १२ ऑगस्ट २०२४ पासून उपोषण करण्याचा इशारा कर्मचारी रंगनाथ बोराडे रमेश पंडित लंकाबाई शिंदे वच्छलाबाई बोर अनिता डोळ सागरबाई पंडित गवळण घडसे यांनी दिला आहे

## शिर्डी अधिवेशनास धारूर तालुक्यातील पदाधिकारी व सदस्य यांनी उपस्थित रहावे –विजय चोरडिया

किल्ले धारूर । प्रतिनिधी

पत्रकार सर्वसामान्यांच्या बातम्यांना शासन व प्रशासन दरबारी मांडून त्यांना न्याय देण्याचे काम करतो. मात्र पत्रकारांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो विशेष म्हणजे त्यांची आर्थिक बाजू सक्षम नसल्यामुळे त्यांचे आर्थिक स्त्रोत वाढले पाहिजेत. तसेच ६० वर्षानंतर पत्रकारांना किमान व्यवस्थित जगता यावे यासाठी पेन्शन मिळणे आवश्यक आहे. मात्र त्यासाठी जाचक अटी लादल्या असून त्या अटी शिथिल करण्यात याव्यात अशी मागणी व्हाईस ऑफ मीडियाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजय चोरडिया यांनी



केली, दरम्यान शिर्डी येथे ३१ ऑगस्ट व १ सप्टेंबर असे दोन दिवशीय होणाऱ्या पत्रकारांच्या अधिवेशनास सर्व पत्रकारांनी उपस्थित रहावे असे आवाहन धारूर येथील बैठकीमध्ये त्यांनी केले. यावेळी व्हाईस ऑफ मीडिया धारूर तालुका पदाधिकारी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या संदर्भात धारूर शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया यांनी प्रमुख उपस्थिती लावून पत्रकारांना मार्गदर्शन केले.यावेळी जिंतूर तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण यांच्यासह ते उपस्थित होते.चोरडिया म्हणाले की, पत्रकारांचे विशेषत: ग्रामीण भागातील पत्रकारांचे विविध प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रश्न प्रलंबित आहेत. ते प्रश्न व्हाईस ऑफ मीडियाने प्रशासन व शासन दरबारी मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला असल्याचे त्यांनी सांगितले. सततच्या पाठपुराव्यामुळेच शासनाने पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली असून त्यासाठी दोन सदस्य अभ्यास ◀◀ पान ३ वर

## स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर अंबाजोगाई शाळेत फिरत्या विज्ञान प्रदर्शनास उदंड प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नेहरु विज्ञान केंद्र, मुंबई व श्री. योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित प. पू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य स्वच्छता विज्ञान प्रचार व प्रसारासाठी फिरत्या विज्ञान प्रदर्शन रथाचे स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर, अंबाजोगाई शाळेत उत्साहाने स्वागत करण्यात आले. यावेळी आयोजित उद्घाटन कार्यक्रमास नवक्षितिज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष श्री. संतोष दादा कुलकर्णी , स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्वरुपाताई कुलकर्णी, नेहरु विज्ञान केंद्र येथील समन्वयक श्री. देवानंद भुसने सर, प. पू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राच्या वतीने श्रीमती क्षीरसागर मॅडम, फिरत्या विज्ञान प्रदर्शन रथाचे चालक श्री. अमित पालांडे, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांचे यथोचित स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता, संतुलित आहार, जलपेय, अन्न, महिलांचे आरोग्य, आजारांचे व्यवस्थापन इ. विविध वैज्ञानिक प्रयोगांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन पाण्याच्या बाटलीचे रॉकेट उडवून करण्यात आले. यावेळी श्रीमती क्षीरसागर मॅडम यांनी विद्यार्थ्यांसमोर दैनंदिन जीवनातील टाकाऊ पदार्थ वापरुन



विज्ञानाचे विविध प्रयोग करुन दाखवले. संस्थेचे अध्यक्ष श्री. संतोष दादा कुलकर्णी यांनी अध्यक्षीय ◀◀ पान ३ वर

## राष्ट्रवादी पक्ष शरद पवार अल्पसंख्यांक तालुका अध्यक्षपदी शौकत पठाण

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

राष्ट्रबादी पक्ष शरदचंद्र पवार अल्पसंख्यांक विभाग तालुका अध्यक्षपदी शौकत अनवर पठाण यांची नियुक्ती झाली असून त्यांना नुकतेच बीड जिल्हा राष्ट्रवादी कीस पार्टी शरदचंद्र पवार अल्पसंख्या विभागाचे जिल्हा अध्यक्ष डॉ नदीम शेख यांनी नियुक्तीचे पत्र राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष महेबूब भाई शेख, माजी आ. साहेबराव दरेकर नाना मुबा नेते अमोल राजे तरटे, बुबा नेते रिजवान शेख यांच्या उपस्थितीत दिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महारा प्रदेशाध्यक्ष आ.जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने चादी काँग्रेस



अल्पसंख्यांक विभागात आशी तालुका अध्यक्षपदी पठाण यांची नियुक्ती करण्यात आली असून शरदचंद्र स्वार यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक यांच्या विकासात आपण भरीव कार्य करून व पक्ष संघटना मजबूत उभी कराल असे नियुक्ती पत्रात नमूद करण्यात आले असून त्यांना मिळालेल्या या नियुक्ती बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून एक होतकरू तरुण तडफदार उमेदवाराची निवड झाल्याबद्दल नक्कीच आपण मा.खा. शरदचंद्र पवार साहेब यांचे विचार तळागाळात पोहोचून पक्ष वाढीसाठी ◀◀ पान ३ वर

## माजलगावचा मयूर राऊत सेट परीक्षा उत्तीर्ण

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष अरुण राऊत यांचे चिरंजीव मयूर उर्फ सुरज राऊत यांनी अत्यांत अवघड अशी असलेली सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे महाराष्ट्र शासन आणि यूजीसी यांच्या माध्यमातून २४ एप्रिल २०२४ रोजी घेण्यात आलेल्या सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्रता परीक्षा घेण्यात आली ही अत्यांत अवघड असलेली परीक्षा मयूर उर्फ सुरज अरुणराव राऊत



हा उत्तीर्ण झाला आहे हे घवघवीत यश संपादन केल्याबद्दल मयूर राऊत यांचे माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील माजी नगराध्यक्ष अशोकराव होके पाटील भारतीय जनता पार्टीचे नेते रमेशराव आडसकर माजी नगराध्यक्ष ◀◀ पान ३ वर






This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# दहशतवादी पुण्यात बॉम्बस्फोट घडवून आणू शकतात? पोलीस आयुक्तांच्या पत्राने खळबळ

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात मागील काही दिवसांमध्ये दहशतवादी संघटनांशी संबधित अनेक जणांना ताब्यात घेण्यात आलं, अनेक कारवाया देखील करण्यात आल्या. अशातच पुण्यातील एका नामांकित हॉटेलला दहशतवाद्यांपासून धोका असल्याची शक्यता पुणे पोलीस आयुक्तांनी व्यक्त केली आहे. सतत गर्दीने गजबजणाऱ्या त्या हॉटेलला पत्र लिहून पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी धोका असल्याची शक्यता व्यक्त केली आहे.



पुणे पोलीस आयुक्त यांनी अमितेश कुमार पत्राद्वारे भीती व्यक्त केली आहे. सतत गर्दी होत असल्यामुळे या हॉटेलला पुणे पोलिसांनी अनेकदा नोटीस बजावल्या आहेत. हॉटेल मधील डिस्कोथेक रद्द करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस देत सुरक्षेचा मुद्दा पोलिसांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, पुणे पोलिसांनी दिलेल्या या पत्रामध्ये सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला आहे. या हॉटेलमध्ये लोक दारु पिऊन धिंगाणा घालत असतात. सध्या अतिरेकी कारवाया बाबत अलर्ट आहे. एखादी अतिरेकी संघटना गर्दीचे ठिकाण लक्ष करुन बॉम्बस्फोटासारखी दुर्घटना घडवून त्यातून मोठ्या प्रमाणात जिवीत हानी आणि वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही असा स्पष्ट इशारा पोलिसांनी या पत्रातून दिला आहे.

हे पत्र स्वतः पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या

## नामांकित हॉटेलला पाठवलं पत्र

सहीने संबंधित आस्थापनेला पाठवण्यात आले आहे. या हॉटेलने आत्तापर्यंत अनेक वेळा नियमांचे उल्लंघन केले असून त्या ठिकाणी असलेल्या डिस्कोथेकमुळे आजूबाजूला राहत असलेल्या रहिवाशांना त्रास सहन करावा लागला आहे,असंही नमूद करण्यात आले आहे. याशिवाय संबंधित हॉटेलवर याआधी सुद्धा अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहे याचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. दरम्यान, त्या हॉटेल आस्थापनेने वेळोवेळी नियम व कायदे, अटी व शर्थीचा भंग केला आहे असं नमूद केलं आहे. पुढे याच पत्रात पोलिसांनी थेट सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला आहे. सदर ठिकाणी कोणतीही चोख सुरक्षा व्यवस्था नसून एखादी आपत्कालीन घटना झाल्यास कोणत्याही प्रकारची पर्यायी प्रभावी सुरक्षा यंत्रणा नाही असं देखील पत्रातून म्हटलं आहे.

एखादी अतिरेकी संघटना गर्दीचे ठिकाण लक्ष करून बॉम्बस्फोटासारखी दुर्घटना घडवून आणून त्यातून मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हा इशारा दिला आहे. पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी या हॉटेलला कारणे दाखवा नोटीस बजावत धोक्याचा इशारा दिला आहे.

# पुणे पोलिसांनी हाताच्या ठशांवरून उत्तर प्रदेशात जाऊन चोरांना पकडले

पुणे । प्रतिनिधी

चोरीच्या गुन्ह्यात हाताच्या ठशांवरून आरोपीचा छडा लावण्यास पोलिसांना यश आले आहे. मार्केटयार्ड परिसरातील एका सोसायटीत वर्षभरापूर्वी एका बंगल्यात घरफोडी करून पसार झालेल्या उत्तर प्रदेशातील चोरट्यांना पोलिसांनी अटक केली आहे. चोरट्यांकडून १२ लाख ७७ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला.



छोटू ऊर्फ सिदू भैय्यालाल राजपूत (वय ३०, रा. कानेमई, जि. कौशंबी, उत्तर प्रदेश, सध्या रा. शिंदे वस्ती, शिवनगरी, कोथरूड) आणि अनिलकुमार ऊर्फ बल्ली रामसिंग राजपूत (वय २७, सध्या रा. मंडई, मूळ रा. बलपूर्वा, जि. कौशंबी, उत्तर प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

गेल्या वर्षी मार्केट यार्डातील संदेश सोसायटीतील एका बंगल्यातून चोरट्यांनी रोकड, तसेच सोन्याचे दागिने असा १४ लाख ५८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. घरफोडी झाल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर सहायक पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. घटनास्थळी चोरट्यांच्या हाताचे ठसे आढळून आले होते.

पोलिसांच्या पथकाने हाताच्या ठशांची पडताळणी केली. एक ठसा सराईत चोरटा छोटू राजपूत याचा असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. राजपूत याच्याविरुद्ध पुणे आणि मुंबईत घरफोडीचे ११ गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली. राजपूत उत्तर प्रदेशात असल्याची माहिती तपासात मिळाल्यानंतर पोलिसांचे पथक तेथे रवाना झाले. चौकशीत त्याने साथीदार अनिलकुमार याच्या मदतीने मार्केट यार्डातील संदेश सोसायटीत घरफोडी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी दोघांकडून सोन्याची लगड, चांदीचे दागिने असा १२ लाख ७७ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. मार्केटयार्ड पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक माया देवरे, गुन्हे शाखेचे निरीक्षक राहुलकुमार खिलारे, सहायक पोलिस निरीक्षक मदन कांबळे, उपनिरीक्षक सुनील भापकर, अमित जाधव, हिरवाळे, कौस्तुभ जाधव, किरण जाधव आणि आशिष यादव यांनी ही कामगिरी केली.

# अजित पवार यांची जनसन्मान यात्रा शुक्रवारी तळेगावमध्ये आमदार सुनील शेळके यांची माहिती

तळेगाव । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जनसन्मान यात्रा येत्या शुक्रवारी (१६ ऑगस्ट) मावळ तालुक्यात येत आहे. या यात्रेदरम्यान अजित पवार तळेगाव दाभाडे व लोणावळा या दोन ठिकाणी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना तसेच अन्य शासकीय योजनांच्या लाभार्थींशी संवाद साधणार आहे.



आमदार सुनील शेळके यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे तसेच वरिष्ठ उपाध्यक्ष पंढरीनाथ ढोरे उपस्थित होते. अजितदादांच्या जनसन्मान यात्रेची सुरुवात नाशिकमध्ये होणार आहे. त्यानंतर नगर जिल्ह्यातून ही यात्रा पुणे जिल्ह्यात प्रवेश करेल. मावळ तालुक्यानंतर पुणे शहर व पिंपरी चिंचवडमध्ये देखील ही यात्रा जाणार आहे, असे शेळके यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या स्वागतासाठी मावळत राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे. जन सन्मान यात्रा तळेगाव येथे सकाळी दहा वाजता मारुती मंदिर चौकाजवळील थोर समाजसेवक नथुभाऊ भेगडे शाळेच्या मैदानावर येणार आहे. पावसामुळे गैरसोय होऊ नये म्हणून त्या ठिकाणी त्या ठिकाणी भव्य मंडप उभारण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह विविध लोकोपयोगी योजना, जनहितासाठी घेतलेले निर्णय याची माहिती अजितदादा या सन्मान यात्रेच्या निमित्ताने जनतेला देणार आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी भगिनींशी देखील ते संवाद साधणार आहेत. शेती पंपांवरील वीज बिल माफी तसेच मावळातील पर्यटन, कृषी पर्यटनाला कशी गती मिळेल याबाबत अजितदादा मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती शेळके यांनी दिली.

मावळ तालुक्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत ५५ हजारांहून अधिक माता-भगिनींनी नावनोंदणी केली. या योजनेचा लाभ तालुक्यातील किमान ८० हजार भगिनींना मिळाला पाहिजे, हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून आपले प्रयत्न सुरू आहेत. या सर्व भगिनींनी कार्यक्रमाला येऊन अजितदादांना राखी पौर्णिमेनिमित्त भेट द्यावी, असे आवाहन आमदार शेळके यांनी यावेळी केले.

# भीमाशंकर कारखान्याला 'देशातील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना' पुरस्कार प्रदान

पुणे । प्रतिनिधी

दत्तात्रयनगर पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यास नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप शुगर फॅक्टरीज लि. (नवी दिल्ली) यांचा सन २०२२-२३ हंगामामधील वसंतदादा पाटील 'देशातील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना' पुरस्कार केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला.



शनिवारी नवी दिल्ली येथे झालेल्या नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप शुगर फॅक्टरीज लि. यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा व 'शुगरकेन अँड बायो एनर्जी-पॉवर ऑफ विकसित भारत' विषयावरील एकदिवसीय परिषदेमध्ये देशातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी केंद्रीय सहकार राज्य मंत्री कृष्णपाल, उत्तर प्रदेश राज्याचे साखर व ऊस विकास मंत्री चौधरी लक्ष्मण नारायण, गुजरातचे माजी मंत्री ईश्वरभाई पटेल, नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप शुगर फॅक्टरीज लि. चे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, उपाध्यक्ष केतनभाई पटेल, कार्यकारी संचालक प्रकाश नाईकनवरे तसेच देशातील साखर उद्योगातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

भीमाशंकर कारखान्याच्या वतीने पुरस्काराचा स्वीकार कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, संचालक अशोक घुले, रामचंद्र ढोबळे, बाबासाहेब खालकर, शांताराम हिंगे, आनंदराव शिंदे, मच्छिंद्र गावडे, अंकित जाधव, अरुण चासकर, बाजीराव बारवे, सिताराम लोहोट, ज्ञानेश्वर अस्वारे, नितीन वाव्हळ, रामहरी पोंदे, पोपटराव थिटे, गणेश कोकणे, पुष्पलता जाधव, प्रिया बाणखेले, कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे, तांत्रिक व्यवस्थापक शिरीष सुर्वे व सचिव रामनाथ हिंगे यांनी केला. बाळासाहेब बेंडे पुरस्काराबाबत माहिती देताना म्हणाले, आर्थिक वर्षात केलेली ऊस उत्पादकता, तांत्रिक गुणवत्ता, वित्तीय व्यवस्थापन, अधिकतम ऊस गाळप, साखर उतारा, ऊस वाढीच्या योजना, कर्ज परतफेड, व्याज, खर्चात केलेली बचत, कमीत कमी उत्पादन खर्च, केलेली गुंतवणूक, वेळेत अदा केलेला ऊस दर, ऊस उत्पादकांना दिलेली ठेवीची पासबुके, संचित नफा, कारखान्याचे नक्त मुल्य, शिल्लक कर्ज उभारणी मर्यादा, कारखान्याने उभारणी केलेला व उपलब्ध निधी, विनियोगासाठी केलेले नियोजन, शिक्षण क्षेत्रातील योगदान व सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून केलेली कामे या सर्व बाबींचा विचार करून कारखान्यास हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

सदर पुरस्कार प्राप्त होणेस कारखान्याचे संस्थापक व राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे दुरदृष्टी नेतृत्व व मार्गदर्शन, संचालक मंडळाचे धोरण, अधिकारी व कर्मचा-यांचे सुयोग्य व्यवस्थापन, ऊस उत्पादक व सभासद वर्गाची साथ यामुळेच शक्य झाले आहे. कारखान्यास देश पातळीवरील १३ व राज्य पातळीवरील १४ असे एकूण २७ पुरस्कार प्राप्त झालेले आहे. देशातील 'सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना' पुरस्कार ६ वेळा मिळविणारा भीमाशंकर हा देशातील एकमेव साखर कारखाना असल्याची माहिती उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी दिली.

# पिस्तूल बाळगणाऱ्या सराइतांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या; दोन पिस्तुलासंह तीन काडतुसे जप्त

पुणे । प्रतिनिधी

पिस्तूल बाळगणाऱ्या सराइतांना पोलिसांनी शंकरशेठ रस्त्यावरील ढोले-पाटील चौकात पकडले. सराइतांकडून दोन पिस्तुलासंह तीन काडतुसे जप्त करण्यात आली.



शुभम अनिल शिंदे ( २४, रा. महर्षीनगर) आणि सिद्धेश अशोक शिगवन (१९, रा. गुलटेकडी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहे. बेकायदा पिस्तूल बाळगल्याप्रकरणी दोघांविरुद्ध खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

शंकरशेठ रस्त्यावरील ढोले-पाटील चौकात (सेव्हन लव्हज चौक) शिंदे आणि शिगवन थांबले होते. त्यांच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती गस्त घालणाऱ्या पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून दोघांना पकडले.

त्यांची झडती घेण्यात आली असताना दोघांकडून देशी बनावटीची दोन पिस्तुले, तीन काडतुसे जप्त करण्यात आली. शिंदे आणि शिगवन यांनी पिस्तूल का बाळगले, तसेच त्यांना पिस्तूल कोणी दिले? यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशीकांत चव्हाण, पोलीस निरीक्षक शर्मिला सुतार , सहायक पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे, उपनिरीक्षक प्रल्हाद डोंगळे पोलीस, पोलीस अंमलदार हर्षल दुडम, किरण ठवरे, नितीन जाधव, लखन ढावरे, आशिष चव्हाण, इरफान नदाफ, प्रमोद भोसले, अक्षयकुमार वाबळे, समीर भोरडे, भालचंद्र दिवटे, कृष्णा गायकवाड, मयूर काळे, संतोष बारगज, उमेश मरुपती, शेखर खराडे, यांचे पथकाने केली आहे.

# मंचर जवळ बिबट्याची मोटरसायकलला धडक: श्रीक्षेत्र आळंदी येथील दोन भाविक जखमी

पुणे । प्रतिनिधी



मंचर ते घोडेगाव रस्त्यावर मंचरच्या पश्चिम दिशेला असलेल्या वडगाव काशिंबेग (ता. आंबेगाव) ग्रामपंचायतच्या कार्यक्षेत्रात शनिवारी (ता. १०) बिबट्याने दुचाकीला धडक दिल्याने दोन भाविक जखमी झाले.

मंचर - मंचर ते घोडेगाव रस्त्यावर मंचरच्या पश्चिम दिशेला असलेल्या वडगाव काशिंबेग (ता. आंबेगाव) ग्रामपंचायतच्या कार्यक्षेत्रात शनिवारी (ता. १०) संध्याकाळी बिबट्याने दुचाकीला धडक दिल्याने दोन भाविक जखमी झाले आहेत. त्यांच्यावर मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुरज अशोक चिंचकर (वय-२५) व आकाश सोमनाथ भिसे (वय-३२, दोघे राहणार श्रीक्षेत्र आळंदी, ता. खेड) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत.

# महिलेस शिवीगाळ, दोघांवर गुन्हा दाखल

आळंदी । प्रतिनिधी

जुन्या भांडणाचा राग मनात धरून २५ वर्षीय महिलेला अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देऊन तिच्या घरासमोरील वाहनांच्या काचा फोडल्याच्या आरोपाखाली अल्पवयीन मुलासह सतीश बवले (रा. वडगाव घेनंद, ता. खेड) या दोघांवर आळंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

आळंदी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि आरोपींमध्ये जुने भांडण आहे. अल्पवयीन आरोपीने शुक्रवारी (ता. ९) दुपारी साडेतीन वाजता महिलेच्या घराच्या दरवाजावर लोखंडी रॉडने जोरजोरात मारले. तसेच, महिलेला अश्लील शिवीगाळ केली. त्याचबरोबर जीवे मारण्याची धमकी देत घरासमोरील चारचाकी स्विफ्ट मोटार, बजाज पल्सर, गॅन्झा, अशा तीन वाहनांची तोडफोड केली. तर, सतीश बवले याने फिर्यादी महिलेस बघून घेण्याची धमकी दिली. याबाबत आळंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सोमवारी होणार जनसंवाद सभा

पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या (झउचउ)सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सोमवार दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत जनसंवाद सभा होणार आहे, अशी माहिती महापालिका प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.



नागरिकांशी सुसंवाद साधणे, तक्रारींचे निराकरण करणे आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये तसेच होणा-या विकासकामांमध्ये नागरिकांच्या आशा आकांक्षांचे प्रतिबिंब उमटावे यासाठी क्षेत्रिय कार्यालयनिहाय महिन्यातील दुस-या आणि चौथ्या सोमवारी सकाळी १० ते १२ या वेळेत महापालिकेच्या वतीने जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येत असते. या सभेकरीता महानगरपालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांसाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय मुख्य समन्वय अधिका-यांच्या नियुक्त्या केल्या असून ते या जनसंवाद सभेचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

# विश्रांतवाडी परिसरातून एक कोटीचे अमली पदार्थ जप्त

पुणे । प्रतिनिधी

- पुण्यात पुन्हा एकदा ड्रग्ज रॅकेट उघड झाले आहे. विश्रांतवाडी परिसरात एमडी ड्रग्जचासाठा पुणे पोलिसांकडून जप्त करण्यात आला आहे. या ड्रग्जचे बाजार मूल्य एक कोटीपेक्षा जास्त असल्याची माहिती आहे. साधारण अर्धा किलो एमडी डॅक्सचा साठा पोलिसांकडून जप्त करण्यात आला आहे.



या प्रकरणी पोलिसांनी ३ तरुणांना अटक केली आहे. श्रीनिवास संतोष गोदजे, रोहित शांताराम बेंडे आणि निमिश सुभाष अभनावे अशी अटक करण्यात आलेल्या तरुणांची नावे आहेत. विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोहगाव येथील विघ्नहर्ता अपार्टमेंटमधून या तीन तरुणांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्या ताब्यातून एक कोटी रुपयाचे ४७१ ग्रॅम मेफेड्रोन हस्तगत करण्यात आले आहे. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने ही कारवाई केली आहे. या संपूर्ण प्रकरणात आंतरराष्ट्रीय रॅकेट असण्याची दाट शक्यता आहे.

# शांतता रॅली निमित्ताने शहरात वाहतूक बदल

पुणे । प्रतिनिधी

अखंड मराठा समाजाकडून काढण्यात येणाऱ्या शांतता रॅली निमित्ताने आज शहरातील विविध भागात वाहतूक बदल करण्यात आला आहे. या कालावधीत वाहनधारकांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती वाहतूक वगळून देण्यात आली.

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात सारसबाग येथुन मराठा आरक्षण शांतता रॅलीला सुरुवात होणार आहे. तेथून बाजीराव रोड, आप्पा बळवंत चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा एस.एस.पी.एम.एस. मार्गे जंगली महाराज रोडने गरवारे पुल छत्रपती संभाजी पुतळा येथे विसर्जन होणार आहे. रॅलीमुळे जेधे चौक परिसर, सोलापुर रोड, सातारा रोड, सिंहगड रोड, टिळक रोड, शास्त्री रोड, लक्ष्मी रोड, केळकर रोड, बाजीराव रोड, शिवाजी रोड, जे. एम रोड, कर्वे रोड, तसेच खंडोजी बाबा चौक या परिसरा मधील वाहतुकीमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने आवश्यकते नुसार वाहतूक बदल करण्यात येणार आहेत. त्यानुसार नवले पुलाकडून येणारी वाहतुक नवीन बोगद्याकडे डायव्हर्शन करण्यात येईल. खडीमशीन चौक जड वाहने कात्रजकडे न सोडता



बोपदेव घाटाकडे जातील. रॅली कात्रज चौक ते होल्गा चौक येताना रॅली पुढे जाईल तशी पाठीमागे वाहतुक सोडण्यात येणार आहे. जेधे चौक ते सिंहगड रोड वाहतुक व्होल्गा चौक, मित्रमंडळ चौक व सावरकर चौक अशी जाईल. सिंहगडरोड कडून येणारे वाहतुक दांडेकर पुल, सावरकर चौक, मित्रमंडळ चौक व व्होल्गा चौक असे जाईल. एस. पी कॉलेज चौक पुरम चौकाकडे वाहतुक बंद राहील. सातारा रोडने मार्केटयार्ड जंक्शन येथून जेधे चौकाकडे वाहतुक बंद राहील. रॅलीच्या मार्गावरील वाहतूक जगोजागी वळविण्यात आली असून रॅली जशी पुढे जाईल त्याप्रमाणे पाठीमागील चौक वाहतुकीसाठी खुले करण्यात येतील, अशी माहिती वाहतूक विभागाकडून देण्यात आली.

# पाऊस व गारपीटमुळे झालेल्या ९२१२ शेतकऱ्यांसाठी अनुदान रक्कम मंजूर

आंबेगाव - आंबेगाव तालुक्यात नोव्हेंबर २०२३ मध्ये अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे अनेक गावातील एकूण नऊ हजार २१२ शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले होते. महसूल व कृषी खात्याने केलेल्या पंचनाम्यानुसार सहा कोटी २४ लाख ५५ हजार ६१२ रुपये नुकसान भरपाईची अनुदान रक्कम शासनाने मंजूर केली होती.



त्यापैकी आठ हजार ८२९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये पाच कोटी ९७ लाख दोन हजार ६७३ रुपये रक्कम जमा झाली आहे.' अशी माहिती आंबेगाव तालुक्याचे तहसीलदार संजय नागटिळक यांनी दिली. ते म्हणाले, 'सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची नुकसान भरपाई रक्कम उपलब्ध आहे. पण १५६ शेतकऱ्यांची केवायसी प्रलंबित असल्यामुळे सात लाख ५२ हजार ९३१ रुपये रक्कम प्रलंबित आहे. तसेच आधार कार्ड अपडेट नसल्यामुळे, बँकेला आधार लिंक नसल्यामुळे ३७३ शेतकऱ्यांचे १९ लाख ९९ हजार ८४८ रुपये रक्कम पडून आहे. याबाबत संबधित शेतकऱ्यांनी याबाबत केवायसी व संबंधित शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे काम सुरू असून केवायसी आधार कार्ड अपडेट, बँकेला आधार लिंक करावी. याबबत महसूल खात्यामार्फत जनजागृती व मार्गदर्शन केले जाते.शेतकऱ्यांनी त्वरित नुकसान भरपाई रक्कम प्राप्त करून घ्यावी.'

cmyk